# नवाकाळ
एकमेव स्वतंत्र दैनिक
NAVAKAL
१०४ शतकोत्तर वाटचाल

• पुणे, शनिवार १६ मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२३६, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 236 Marathi - Daily - Pune, 16 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
navakal.in
NEET ची नवीन तारीख जाहीर!
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


# सीएनजी मागोमाग पेट्रोल-डिझेलची ३ रुपये दरवाढ
## सर्वसामान्यांना फटका! जीवनावश्यक वस्तू महागणार

**देशातील पाच राज्यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सीएनजीची दरवाढ झाली, रिक्षा चालकांनी लगेच भाडेवाढ मागितली, त्यानंतर दूध २ रुपयांनी महागले, आज सरकारने आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे कारण देत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लीटर प्रत्येकी ३ रुपये वाढ केली आहे. येत्या काही दिवसांत पुन्हा दरवाढ होईल असे संकेत आहेत. आताच्या परिस्थितीत या दरवाढीतून कंपनीला ४८ हजार कोटी मिळणार आहेत. मात्र या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढणार असून, त्याचा थेट परिणाम दूध, भाज्या, किराणा आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे.**

■ नवी दिल्ली

**पेट्रोल-डिझेलचे** नवीन दर आजपासूनच लागू झाले आहेत. नवीन दरानुसार आजपासून राजधानी दिल्लीत पेट्रोल प्रति लीटर ९७.७७ रुपये व डिझेल ९०.६७ रुपये, मुंबईत पेट्रोल १०६.६८ आणि डिझेल ९३.१४ रुपये, कोलकात्यात पेट्रोल १०८.७४ व डिझेल ९५.१३, चेन्नईत १०३.६७ व डिझेल ९५.२५ रुपये झाले आहे. या दरवाढीमुळे रोजच्या प्रवासाचा खर्च वाढणार असून, वाहतूक भाडे आणि दैनंदिन वस्तूंच्या किमतीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

या दरवाढीमागे आंतरराष्ट्रीय बाजारातील कच्च्या तेलाच्या किमतीतील मोठी वाढ हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. इराण-अमेरिका तणाव आणि होर्मुज सामुद्रधुनी परिसरातील अस्थिर परिस्थितीमुळे जागतिक तेलपुरवठ्यावर परिणाम झाला असून, कच्च्या तेलाचे दर ७० डॉलरवरून वाढून १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत. केंद्र सरकारने यापूर्वी नागरिकांना दिलासा देण्यासाठी पेट्रोल व डिझेलच्या उत्पादन शुल्कात प्रत्येकी १० रुपये कपात केली होती. पेट्रोलवरील शुल्क १३ रुपये प्रति लिटरवरून ३ रुपयांपर्यंत कमी करण्यात आले होते, तर





डिझेलवरील शुल्क १० वरून शून्य करण्यात आले होते. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारातील सततच्या चढ-उतारांमुळे आणि पुरवठा साखळीवरील ताणामुळे तेलाच्या किमती कायमस्वरूपी रोखून धरता येणार नसल्याने दरवाढीचे संकेत केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी दोन दिवसांपूर्वी दिले होते. निवडणूक प्रक्रिया संपल्यावर ही दरवाढ लगेच केली जाईल अशी आधीपासून चर्चा होती.

सरकारच्या मते इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या सरकारी कंपन्यांना आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे भाव वाढल्यावरही स्थानिक भाव स्थिर ठेवावे लागत होते. त्याची भरपाई सरकार करत होती. या कंपन्यांना पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या विक्रीवर दरमहा सुमारे ३०,००० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. एक लीटर पेट्रोलमागे १४ रुपये, तर एक लीटर डिझेलमागे ४२ रुपये तोटा होत आहे. त्याची भरपाई सरकारला करावी लागत होती. आता या दरवाढीतून ही भरपाई होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी पश्चिम आशियातील भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन पेट्रोलियम उत्पादनांचा काळजीपूर्वक वापर करण्याचे आवाहन देशवासीयांना केले होते होते. पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर अत्यंत संयमाने करायला हवा. आपण आयात केलेल्या पान ७ वर

### सिंधुदुर्गात उबाठाचे आंदोलन

पेट्रोल-डिझेल दरवाढीच्या निषेधार्थ उबाठा शिवसेनेने कणकवलीत माजी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन केले. बसस्थानक ते आप्पासाहेब पटवर्धन चौकापर्यंत मोर्चा काढत शिवसैनिकांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी वैभव नाईक म्हणाले की, पेट्रोल, डिझेलसोबतच सीएनजी आणि गॅस सिलिंडर दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. दरवाढ थांबली नाही तर राज्यभर आंदोलन करू.

# तीन मुलींचा स्वयंपाक कोण करणार?
## अत्याचार झाला! पण रुग्णालयात भरती नको

**२०१२ च्या निर्भया प्रकरणानंतर दिल्ली पुन्हा धावत्या बसमध्ये झालेल्या सामूहिक अत्याचाराच्या घटनेने ११ मे रोजी हादरली. अत्यंत क्लेशदायक बाब अशी की, अत्याचार झालेल्या दुर्दैवी पीडित महिलेने उपचारांसाठी रुग्णालयात दाखल होण्यास नकार दिला. ती म्हणाली की, मी रुग्णालयात राहिले तर माझ्या तीन मुलींसाठी स्वयंपाक कोण करणार? माझ्या पतीची काळजी कोण घेणार? तिच्या या सवालांना कुणाकडेच उत्तर नव्हते. एक महिला आपल्या कुटुंबासाठी किती सोसते त्याचे हे जळजळीत वास्तव आहे.**

■ नवी दिल्ली

**पोलिसांनी** या प्रकरणात सामूहिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून आरोपी चालक उमेश आणि वाहक रामेंद्र यांना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. या गुन्ह्यात वापरलेली बस जप्त केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला मंगोलपुरी येथील कारखान्यात काम करते आणि आपल्या कुटुंबासह पीतमपुरा परिसरात राहते. ती कामावरून घरी परतत होती. सरस्वती विहार परिसरातील बी-ब्लॉक बस स्टँडजवळ ती ई-रिक्षातून उतरून पुढे पायी जात होती. त्यावेळी तिला रस्त्याच्या कडेला एक

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

बस उभी दिसली. बसजवळ उभ्या असलेल्या वाहकाकडे तिने वेळ विचारली. मात्र, वाहकाने तिला जवळ बोलावून जबरदस्तीने बसमध्ये पान ७ वर

# पुण्यातील हॉटेलात शरद पवार गटाच्या नेत्यांची गुप्त बैठक

■ पुणे

**अजित पवार** यांच्या अपघाती मृत्यूनंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. विलीनीकरणासाठी शरद पवार सकारात्मक आहेत, अशीही चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर पुण्यात शरद पवार गटाची एका हॉटेलमध्ये काल गुप्त बैठक झाली, अशी चर्चा आज रंगली. या बैठकीचे फोटोही व्हायरल झाले.

या बैठकीला माजी गृहमंत्री अनिल देशमुख, खासदार अमोल कोल्हे, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, राजेश टोपे, बाळासाहेब पाटील, शरद पवार गटाचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम उपस्थित होते, असे सांगण्यात आले. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचा मुद्दा चर्चेत आहे. अजित पवारांशी आपली विलीनीकरणासंदर्भात चर्चा सुरू होती, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. मात्र अजित पवार गटातील पुढच्या फळीतील नेते सुनिल तटकरे आणि प्रफुल्ल पटेल अशी काही चर्चा सुरू होती याबद्दल अजित पवार आपल्याशी कधीही बोलले नव्हते, असे वारंवार सांगत आहेत.

# मुंबईत आंबा-काजू उत्पादकांचा मोर्चा सुरू होण्याआधीच आंदोलकांची धरपकड
## नेत्यांना ताब्यात घेतले

■ मुंबई

**कोकणातील** आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी मुंबईत आज मोर्चाचे आयोजन केले होते. गिरगाव ते मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानापर्यंत हा मोर्चा निघणार होता. मात्र, पोलिसांनी या मोर्चाला परवानगी दिली नव्हती. त्यामुळे तो काढण्याची तयारी सुरू असतानाच पोलिसांनी कारवाई करत आंदोलकांसह नेत्यांना ताब्यात घेतले.

बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने यावर्षी कोकणातील आंबा आणि काजू बागायतदार आर्थिक संकटात सापडले आहेत. दोन दिवसांपूर्वी सरकारशी झालेल्या बैठकीत तोडगा निघाला नाही. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे



अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आज गिरगाव चौपाटी ते मुख्यमंत्री निवासस्थान वर्षापर्यंत मोर्चा नियोजित केला होता. मात्र, मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगत पोलिसांनी गिरगाव चौपाटी परिसरातच आंदोलनकर्त्यांना अडवले. मोर्चा सुरू होण्यापूर्वीच नेत्यांसह शेकडो आंदोलकांची धरपकड केली. आंदोलकांना आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा पर्याय दिला होता. परंतु तो नाकारत त्यांनी थेट मुख्यमंत्री निवासस्थानावरच जाण्याचा आग्रह धरला होता. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये पान ७ वर

# आयात शुल्कवाढीनंतर सोने आयातीवरही निर्बंध

■ मुंबई

**मध्य** पूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल-डिझेलचा कमी वापर आणि सोने खरेदी न करण्याचे आवाहन केल्यानंतर केंद्र सरकारने काही कठोर निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसांपूर्वी सोन्यावरील आयात करात मोठी वाढ केल्यानंतर आता सरकारने सोन्याच्या आयातीवरही निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार परवानाधारक सोने आयातदारांना आता एका वेळी कमाल शंभर किलो सोने आयात करण्याची परवानगी देण्यात आली आहे. सरकारच्या या धोरणामुळे सोने तस्करीला प्रोत्साहन मिळेल, अशी भीती सराफा संघटनेने व्यक्त केली आहे.

भारत हा जगातील सोन्याचा दुसरा मोठा आयातदार देश आहे. म्हणजेच बहुतांश सोन्याची मागणी आयात करूनच पूर्ण केली जाते. सध्या इराण-अमेरिका युद्ध सुरू असल्याने कच्च्या तेलाचे भाव गगनाला पान ७ वर

# नीट परीक्षा आता २१ जून रोजी

■ नवी दिल्ली

**३ मे रोजी** घेण्यात आलेली आणि पेपरफुटीमुळे रद्द केलेली नीट-यूजी परीक्षा येत्या २१ जून रोजी घेण्यात येईल, अशी घोषणा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज पत्रकार परिषदेत केली. ही परीक्षा विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक ठरू नये यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे, अशी ग्वाही प्रधान यांनी याप्रसंगी दिली.

शिक्षण माफियांनी केलेल्या गुन्ह्यामुळे प्रामाणिकपणे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये आणि अयोग्य उमेदवाराला संधी मिळू नये या उद्देशाने ३ मे रोजी घेतलेली नीट परीक्षा रद्द करण्याचा निर्णय एनटीएने घेतला. पान ७ वर

# रुपयाचा नवा नीचांक! प्रति डॉलर ९६ रुपये

**नवी दिल्ली** - मध्य पूर्वेतील युद्धामुळे कच्चा तेलाचे भाव गगनाला भिडल्याने भारतीय रुपयाची अमेरिकन डॉलरसमोर गेले काही दिवस सातत्याने घसरण होत आहे. रोज नवनवा नीचांक गाठणाऱ्या रुपयाने आज प्रति डॉलर ९६ रुपये अशी सर्वाधिक नीचांकी लोळण घेतली. मध्य पूर्वेत इराण-अमेरिका यांच्यातील युद्ध थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात अस्वस्थता आणि अस्थिरता निर्माण झाली आहे. इराणने होर्मूज सामुद्रधुनी रोखून धरल्याने जगाचा महत्त्वाचा तेलमार्ग बंद झाला आहे. परिणामी कच्च्या तेलाचे भाव ८५ डॉलर प्रति पिंपावरून ११० डॉलर प्रति पिंपापर्यंत वाढले आहेत.

# आता वांद्रे-गोरखपूर विशेष ट्रेन
## परप्रांतीयांसाठी सेवा

■ मुंबई

**मुंबईतील** रेल्वे प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वेने परप्रांतीय प्रवाशांसाठी बांद्रा टर्मिनस-गोरखपूर दरम्यान विशेष रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. उत्तर प्रदेश आणि उत्तर भारतात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या पाहता ही विशेष सेवा जाहीर करण्यात आली आहे. तसेच मुंबई सेंट्रल-काठगोदाम मार्गावरील विशेष गाड्यांच्या फेऱ्यांमध्येही वाढ करण्यात आली आहे.

गाडी क्रमांक ०९१५७ बांद्रा टर्मिनस - गोरखपूर विशेष रेल्वे १७ मे २०२६ रोजी रविवारी पहाटे १२.३० वाजता बांद्रा टर्मिनस येथून सुटणार असून, दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.३० वाजता गोरखपूर येथे पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०९१५८ गोरखपूर-बोरिवली विशेष रेल्वे १८ मे २०२६ रोजी सोमवारी रात्री ८.३० वाजता गोरखपूर येथून सुटणार असून बुधवारी सकाळी ११.३० वाजता बोरिवली येथे पोहोचेल.ही विशेष रेल्वे दोन्ही दिशांना बोरिवली, वापी, सुरत, वडोदरा, रतलाम, नागदा, कोटा, सवाई माधोपूर, पान ७ वर


उवा लिखां डोक्यातील कोंडा पळतील झटपट
रेपल लाइसनिट
Rs. 60/-


लावा फटाफट
१००% आयुर्वेदिक तेल
विषारी रसायन विरहित
लहान मुलांसाठी १००% सुरक्षित
Only Whatsapp : 8369087234
SS:Mumbai-STL Pharma
Pune : Bhagwati Medicals & Inorbit.
बर्फिला COOL घमौरी पाउडर
बजर-रंगी लेप
रेपल अडुलसा

गुणवत्तेसह बचत - दोन्हींचा मेळ

HUID हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांची
मजुरी सरसकट 8%
ही योजना मर्यादीत कालावधीसाठी.
डेबिट / क्रेडिट कार्डसाठी ही योजना लागू नाही.
117 वर्षांची परंपरा असणारी मराठी पेढी
वामन हरी पेठे सराफ
आजच जवळच्या शाखेला भेट द्या.
गिरगाव पेठे बिल्डिग, ठाकुरद्वार नाका. फोन: 9769770301
विरार पश्चिम दफ्तरी बिल्डींग, एम. वी. इस्टेट. फोन : 7559259887 8698699887
दादर पश्चिम पोपटलाल बिल्डिग, रानडे रोड. फोन: 9833176699
विरार पूर्व स्टेशनजवळ, मिर्झा शॉपिंग सेंटर. फोन : 8177849887

महानगर गॅस
₹0 आगाऊ शुल्क
नवीन घरगुती पीएनजी ग्राहकांसाठी
पीएनजी रजिस्ट्रेशन कँपला भेट द्या आणि लगेच रजिस्टर करा!
दिनांक: रविवार, 17 मे 2026 | वेळ: सकाळी 10 ते सायंकाळी 6 | स्थळ: मुंबई पब्लिक स्कूल, प्रतीक्षा नगर, सायन - 400022
सूचना: डायरेक्ट मार्केटिंग एजन्सी/प्लंबर/सेल्समन/टेक्निशियन यांना कोणतेही शुल्क द्यायचे नाही.
*सर्व लागू शुल्क रजिस्ट्रेशन आणि पीएनजी मीटर इन्स्टॉलेशन नंतरच्या पहिल्या बिलात देय होईल.
सोबत मिळवा
₹500 किंमतीचा गॅस मोफत!

*अटी लागू.
आजच रजिस्टर करा
गॅसीफाईड बिल्डिंगसाठी
ज्या बिल्डिंगमध्ये आधीपासूनच कोणी ना कोणी पीएनजी वापरत आहे अशी बिल्डिंग.
खाली दिलेला क्यूआर कोड स्कॅन करा, आणि पीएनजी रजिस्ट्रेशन करा. एमजीएल वेबसाईटवरून पेमेंट करा.
नॉन-गॅसीफाईड बिल्डिंगसाठी
जिथे कोणीही पीएनजी वापरत नाही अशी बिल्डिंग
Call Us: (022) 6867 4500
WhatsApp : 9899203843 वर MGLPNG असा संदेश पाठवा
किंवा
आपल्या जवळचे वॉक-इन सेंटर शोधण्यासाठी स्कॅन करा.
अन्य माहितीकरिता आम्हाला support@mahanagargas.com वर लिहा.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

प्रिंटिंग प्रेसकरिता कॉन्ट्रॅक्ट सिस्टमवर लॅमिनेशन आणि पंचिंग ऑपरेटर पाहिजेत. सर्वेश पावस्कर. **9819203677,** B24, जय नारायण इस्टेट, वालिया टेरेसच्या पाठीमागे, प्रितम हॉटेलसमोर, गोरेगाव पूर्व, मुंबई- 400063. {NC260576}

कुर्ला ते ठाणे / नवीमुंबई एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **7208993036** {NC260483}

मावशी, वॉर्डबॉय, कुक, नर्स, ड्रायव्हर, पेशंटकेअर (MALE + FEMALE) पाहिजेत. (राहणेखाणे + पगार) वीकेअर होम (महिला आश्रम) ठाणे. **9136404828** {NC260489}

घर कामासाठी बाई पाहिजे आहे लोढा, अप्पर ठाणे, डोंबिवली (वेस्ट), संपर्क : **8169837819** {NC260525}

कटींग मशिन बाईंडर, ऑफसेट प्रिंटर आणि फिडरमेन बोईलर पाहिजेत. गोरेगांव ईस्ट. संपर्कः **9987049101** {NC260533}

स्त्री पुरुष केअर टेकर पाहिजेत घरकुल केअर सेंटरः **9819426634/ 9969529162** {NC260505}

सिक्युरिटी गार्ड्स हवेत. मुलुंड पूर्व येथील एका मोठ्या सोसायटीला ६ चांगले सिक्युरिटी गार्ड्स हवेत. कामाच्या स्वरुपासाठी फोन करा नंतर भेटा. **9820025316** आधार कार्ड, बँक अकाऊंट आवश्यक. जवळ राहणाऱ्या प्राधान्य. {NC260534}

इमिटेशन ज्वेलरीमध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग आणि पॅकिंगसाठी अनुभवी मुली पाहिजे. दहिसर पूर्व. Contact : **8169999128** {NC260439}

घरी काम करायला जोडपे पाहिजे. राहायची आणि खायची शाकाहारी सोय. बाई घरी काम करेल, पुरुष ऑफिसमध्ये काम करेल. पगार- 20,000/- फोन - **9820355492** {NC260497}

## पाहिजेत

म्युचलफंड तसेच इनडोअर/ आऊटडोअर बॅकऑफिस, कॉम्प्युटर जाणकार टेलीकॉलर, CA, MBA, ACCOUNTANT, 12 वी पास ऑफीस स्टाफ तसेच प्युन पाहिजेत. संपर्कः नयन सरैया, 1002, 10वा मजला, सिनर्जी बिझनेस पार्क, BHD विरवानी इंडस्ट्रीयल इस्टेट, गोरेगाव पूर्व. मुंबई-400063. इंटरव्ह्यू तारीखः 20/05/2026. बुधवार- **7498151996**. वेळः सकाळी 11.00 ते 2.00 {NC260577}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे आकर्षक पगार (मालाड वेस्ट)- **9136731541** {NC260448}

भायखळा/ माझगांव विभागात कुरीयर डिलीव्हरीसाठी कमिशन/ पगारावर मुले पाहिजे. (Daily payment) **7208841538** {NC260548}

वृद्धाश्रममध्ये केअरटेकर, हाउसकीपर, स्वयंपाकी पाहिजे राहण्याची खाण्याची सोय, महिना 12000-14000 पगार. कर्जत आणि पनवेल. **8291912166/67**{NC260545}

**भिवंडी/ मुंब्राच्या जवळ टेक्स्टाइल कंपनीला हेल्पर लेबर पाहिजेत! संपर्कः IMRAN: 8104662988 {NC260544}**

४ कलर ऑफसेट प्रिंटिंगकरिता ऑपरेटर पाहिजे. संपर्क- सह्याद्री ऑफसेट पणजी, गोवा. मो.नं.- **9860897379** {NC260530}

सिक्युरिटी हाऊसकिपिंग कंपनीला-सेल्स / मार्केटिंग मॅनेजर, अकाऊंटंट, ॲडमिन, टेलिकॉलर, एरिया मॅनेजर, फील्ड ऑफिसर, सिक्युरिटीगार्ड/ सुपरवायजर, हाऊसकिपिंग मुले / मुली पाहिजेत- **9223380569/68** {NC260492}

दादरयेथे 12 तास ड्युटीसाठी Male वॉचमन/ सिक्युरीटी गार्ड पाहिजेत. वय-60 च्या आत. **8879659774/ 9869278658** {NC260542}

## पाहिजेत

पॅकींग, खोका पेस्टिंग, लेबल पेस्टिंग, ऑफसेट प्रिंटिंग कामासाठी हेल्पर मुले-मुली-स्त्रिया परेल व घाटकोपरयेथे पाहिजेत. **9324804793** {NC260511}

बांद्रा ते चर्चगेट एरियासाठी बायकर्स पाहिजे. गॅस मीटर रिडींग, प्रति विझिट 30/- + इन्सेन्टिव्ह. **9820385767** {NC260485}

मरीनलाईन्स ऑफिसमध्ये साफसफाई इतर कामासाठी लेडी प्यून पाहिजे, वय- 35. वेळ- (9.45 - 6.15) पगार- 12,000/- शिक्षण- दहावी. ॲडव्होकेट जैन- **9820113939** {NC260486}

मुलुंड येथे गारमेंट ऑफिससाठी ऑफिस व फिल्डवर्कसाठी लेडीज पाहिजेत. (वय 18 ते 30) **9653128763 / 8104614956 / 9920563855** {NC260499}

''कालबादेवीमध्ये ऑफिस कामासाठी SSC (पास/ नापास) मुली पाहिजे (वयः 18-25)'' :- **9820338880** {NC260421}

मुंबईस्थित प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला मुंबई आणि नवीमुंबई येथे वॉटर प्युरिफायर व एअर कंडिशनरच्या दुरुस्ती आणि सर्व्हिसिंगसाठी अनुभवी / अननुभवी पाहिजेत. संपर्कः- **9372756041 / 8355838996 / 9222226768** {NC260479}

पाहिजे ड्रायव्हर ३ व्हील्स टेम्पोसाठी, रूम - २ , समतासदन, पोदार रोड नियर गुरुद्वारा मालाड ईस्ट- **9320536295 / 9022357919** {NC260498}

प्रिंटिंग प्रेस बाईंडिंग विभागासाठी बाईंडर आणि हेल्परची आवश्यकता आहे. पत्ताः B-205, श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, जय कोच, गोरेगाव (ईस्ट), मुंबई. संपर्क कराः **9664073035** {NC260328}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजेत डिलिव्हरीबॉय, डीटीपी ऑपरेटर, अकाऊंटंट. संपर्कः- क्रियेटिव्ह आर्ट, युनिट 41, ओल्ड रामगोपाळ इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकिजसमोर, डॉ. आरपी रोड, मुलुंड (पश्चिम) **9892270217 / 8976167616 / 9222806020** {NC260434}

वसईतील ॲड एजन्सीमध्ये टेलीकॉलरची (महिला) आवश्यकता आहे, फ्रेशर्स व अनुभवी, शिक्षण - ग्रॅज्युएट, त्वरित संपर्क - **9665813437** {NC260524}

## पाहिजेत

''घाटकोपर स्थित रियल ईस्टेट कंपनीसाठी महिला कॉम्प्युटर ऑपरेटर, आऊटडोअर असिस्टंट आणि वर्कफ्रोम होमकरिता पाहिजेत''. संपर्कः- **9323409038** {NC260512}

CCTV टेक्निशियन पाहिजेत. कांदिवली **9920653049** {NC260473}

प्रमोशनच्या कामासाठी मुंबई आणि महाराष्ट्रात महिला ग्रुप पाहिजेत. 5 तास काम. 500 पगार दिवसाला **8108106008** {NC260532}

अंधेरीयेथील लॉजिस्टीक कंपनीला MGL च्या कामासाठी कोऑर्डीनेटर पाहिजे. बारावी/ एक्सेल आणि मुंबईची माहिती आवश्यक आहे. अनुभवींना प्राधान्य. पगार 25,000/- संपर्क- **9820385767** {NC260536}

इलेक्ट्रिकल कामासाठी हेल्पर, वायरमन पाहिजेत. पगार 15000 ते 22000 गाडीभाडे मिळेल. **9820432870/ 9819017461** {NC260561}

ग्रँट रोडजवळ राहणाऱ्या महिलेसाठी घरकाम करणारी बाई पाहिजे. **9820081668** {NC260563}

बोरिवली - पेस्टकंट्रोल मार्केटिंग कामासाठी स्मार्ट - अनुभवी - पगार 12000 / 19000 कमिशन **: 8169473531 / 9898637635** {NC260564}

जोगेश्वरी जय कोचजवळ प्रिंटिंग प्रेससाठी ऑफिस बॉय पाहिजे. **9320255500** {NC260565}

''गोराईत'' कॉम्प्युटराइझड अकाऊंटसाठी कमीतकमी २ वर्षे अनुभवी असिस्टंट पाहिजेत. **9322276066/ 9833537741/ 9867266746** {NC260566}

वरळी येथील ५० सभासदांच्या हाऊसिंग सोसायटीमध्ये कार्यालयीन कामासाठी पूर्णवेळ कारकून त्वरित हवा आहे. वयाची अट नाही. शिक्षण : पदवीधर किंवा १२ वी (वाणिज्य) कॉम्प्युटरमध्ये words/ excel/ tally चे ज्ञान. पगारः पात्रता व अनुभवानुसार. अर्ज पाठवाः <venus45d@gmail.com> {NC260568}

चर्चगेट येथे माळी कामासाठी पूर्ण वेळ मुले पाहिजेत. गोखले- **9322259717.** {NC260555}

तातडीने हवी आहेः २४ तास घरकाम करणारी महिला पगारः १८,००० रुपये राहण्याची सोय आणि जेवण दिले जाईल. वयोगटः २५ ते ४५ वर्षे संपर्कः **9820070067 / 9820030023** मंजू सी. भेंडे {NC260557}

## पाहिजेत

भांडुप पश्चिम येथे ऑफसेट प्रिन्टींगसाठी बॉयलर, फिडरमेन पाहीजेत. संपर्क **8108130509.** {NC260554}

दादरमध्ये सिंगल कलर हेडलबर्ग फिडर, बोलर तसेच SEYPA कटिंग मशीनकरिता हेल्पर पाहिजे. संपर्कः **9821181028** {NC260558}

भांडुप येथे Female Office Assistant पाहिजेत. वय - ३० वर्षापर्यंत. संपर्क : **9137590722.** {NC260559}

माहिम येथे टू व्हिलर चालवण्याचा अनुभव असलेले डिलीव्हरी बॉय पाहिजेत. **9702202020** {NC260572}

त्वरित पाहिजेत ऑफिस असिस्टंट व TALLY ऑपरेटर (TALLY PRIME चा पूर्ण अनुभव पाहिजे) व सेल्समेन. किमान २ वर्षाचा अनुभव व बांद्रा ते दहिसरमध्ये राहणारे पाहिजे (वय 25 ते 40 वर्ष) मोबाईल **-9821232807/ 9324706797** {NC260553}

उमरगाव (वलसाड) गुजरात. ऑफसेट प्रिंटिंग मशीनवर प्रिंटर, फिडरमेन, बॉलर पाहिजेत. **9820039302.** {NC260556}

गोरेगाव पूर्व येथे व्हेज/ नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी कर्मचारी पाहिजेत हेड शेफ, सेमी किचन हेल्पर, पॅकींग स्टाफ, किचन हेल्पर, कॅप्टन/मॅनेजर, टेबल क्लिनर, एक्झिक्युटिव्ह शेफ, डिलिव्हरी बॉय ब्रेड्स मेकर. अनुभवी उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. संपर्कः **9833119998** {NC260570}

सुरक्षारक्षक, हाऊसकीपिंग, सुपरवायझर, पँट्रीबॉय- मुलुंड, दादर, गोवंडी, वरळी, मुंबईसेंट्रल, ठाणे, **8422880511/ 8291056761/ 8422880515/ 9221560330/ 9326200875** {NC260571}

पेस्ट कंट्रोल ऑपरेटरसाठी अनुभवी/ बिनअनुभवी कामगार पाहिजेत. गिरगांव **9820534868/ 9833832512** {NCC260016}

स्त्री-पुरुष वृद्धाश्रमात कामासाठी पाहिजे. मोफत राहण्याची खाण्याची सुविधा- **7040206848** {NC260438}

महानगर गॅसच्या मीटर रीडिंगसाठी (बाईकर) पाहिजेत. पगार 22,000/- + 3,000/- TA, दिव्यम एक्सप्रेस **9820385767/ 7208993036** {NC260571}

25,000 (Salary+ Incentives) पाहिजेत आऊटडोर प्युन, हाऊसकीपिंग (स्त्री/पुरुष), क्रिस्टल हॉस्पिटल, दहिसर- **8976878444** {NC260575}

## पाहिजेत

मुंबई-लालबागमध्येः बाहेरच्या कामासाठी 'माणूस' पाहिजेत. संपर्क- **9324151518** {NC260578}

## Situation Vacant

Rangeela Art Pvt Ltd. 252/258, Zaveri Bazar, Mumbai- 400002. We are looking for a Sales Girl for our imitation jewellery showroom. Requirements: *Good communication skills B Com passed Location: Zaveri Bazar, Mumbai Contact: **+919820442707** Interested candidates can call or WhatsApp for details. {NC260550}

Required outdoor duty/ peon at kandivali west (western line) age 20-35- call on **9868423657** {NC260551}

Required female Data Entry Operators in Naigaon (West) **9834009073 / 9561632492** {NC260457}

Wanted Peon, computer operator, Accountant retired person, students, male female **9167683051.** {NC260567}

Required Outdoor Clerk, B1, Dhannur Bldg., 1st Floor, Phirosha Mehta Road, Fort/ CST. **9819321410** {NC260562}

Required Assistants for a valuation firm in Sewri. WhatsApp **9820047643** kishorekaramsey@gmail.com {NC260560}

Borivali (West) Near Station, Newspaper Advertising Agency requires "DTP Operator". getmejob1@gmail.com {NC260569}

## शैक्षणिक

आपले शिक्षण अर्धवट राहिले आहे का? खर्डीकर क्लासेस... हमखास पास! शाळा सोडलेल्यांसाठी वा नापास विद्यार्थ्यांसाठी शिक्षण सुरु करण्याची हिच योग्य संधी! इयत्ता १० वी व १२ वी साठी प्रवेश सुरु. NIOS/SSC / HSC (Arts/ Commerce/ Science) संपर्कः **7506987030** {NC260549}

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC260552}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई- **8080502190 / 8850530054** {NC260471}

## जागाविषयक

रो-हाऊस प्लॉट १ गुंठा ६ लाख, ६० मीटर-३ लाख, विकणे आहे. MMRDA 3.0 री महामुंबई पासून ५ किलोमीटर अंतरावर, रोड टच, प्राईम लोकेशन लोढा ग्रुप / हिरानंदानी प्रोजेक्ट जवळ संपर्कः- **9920887465 / 8828987465** {NC260478}

## प्रॉपर्टी

**भव्य घरकुल योजना, मंगलमूर्ती अपार्टमेंट G+5 एरिया 550-18,00,000/- (Cash)/ 25,00,000/- (लोन 80%) बुकींग-1,00,000/- नालासोपारा पश्चिम. 9870316444 {NC260574}**

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3,000/- कमवा. अनिरुद्धा दादर- **9076403434 / 8652643434** {NC260411}

## फिल्मविषयक

महेश्वर फिल्म्स इंटरनॅशनल आगामी मराठी, हिंदी फिल्म सीरिअल, एल्बमसाठी सर्व वयोगटातील नवीन कलाकारांसाठी योग्यते अनुसार मौका (ऑडिशन / ट्रेनिंग) : **9136034519 / 8369152017** {NC260495}

## वधु वर मेळावा

वधु वर मेळावा, शिबीर, सर्व जाती थेट भेट कल्याण. **9869868620** {NC260009}

## वृद्धाश्रम

चांगले, आजारी, सिझोफेनिया, डेमनशिया, मनोरुग्ण, कोमात असलेले, मुले-मुली, वृद्धांसाठी तात्पुरते, शेवटपर्यत औषध. उपचारासह संगोपन. घरी घेऊन जाण्यासाठी येतो. **9082356927** {NC260541}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.
- मॅनेजर, 'नवाकाळ'

# गाळाची ४८ तासांत विल्हेवाट लावा महापालिकेचा अधिकाऱ्यांना इशारा


■ मुंबई

**मुंबईत** नदी-नाल्यांमधून काढण्यात आलेल्या गाळाची निश्चित ठिकाणी ४८ तासांच्या आत विल्हेवाट लावण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली असून, गाळ वेळेत हटवला जात नसल्याची तक्रार मुंबईकर किंवा लोकप्रतिनिधींनी केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिला आहे.

रस्त्याच्या कडेला गाळ पडून राहिल्याचे आढळल्यास संबंधित अभियंत्यांवर कारवाई केली जाईल. तसेच दुय्यम अभियंता आणि सहाय्यक अभियंत्यांनी दररोज प्रत्यक्ष कार्यस्थळी उपस्थित राहावे, असे निर्देशही बांगर यांनी दिले. मुंबई महापालिका क्षेत्रातील नदी आणि नाल्यांमधून गाळ काढण्याच्या कामांचा आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीला प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) सुनीलदत्त रसाळ यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मुंबईतील मोठे आणि लहान नाले यांमधून गाळ काढण्याची कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तरंगता कचरा टाकला जात असल्याने त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेशही देण्यात आले. नालेसफाई पूर्ण झाली असली तरी पुन्हा-पुन्हा तरंगता कचरा बाहेर काढण्याची मोहीम राबवावी.







# आजचे राशी भविष्य

शनिवार ता. १६ मे २०२६
ज्योतिष पंडीत शिरीष प्रभू

| | |
|---|---|
| मेष | दगदगीचा दिवस आहे. कौटुंबिक आघाडीवर तडजोड करावी लागेल. तब्येत सांभाळा. |
| वृषभ | महत्त्वाचे निर्णय लांबणीवर टाकणे योग्य ठरेल. सावध वाटचाल हितावह राहील. अतिउत्तेजित होणे टाळा. |
| मिथुन | दिवस फारसा अनुकूल नाही. जोडीदार व सहकाऱ्यांशी विसंवाद संभवतो. संयमाने काम पूर्ण करा. |
| कर्क | प्रगतीकारक दिवस आहे. महत्त्वाचा निर्णय घेणे हिताचे ठरेल. शुभकार्यामध्ये सामील होण्याचे योग. |
| सिंह | धार्मिक कार्यक्रमात सहभाग आनंद देईल. महत्त्वाचे निर्णय आज नकोत. कामे सुरळीत पार पडतील. |
| कन्या | जोडीदाराशी विसंवाद संभवतो. अहंपणा टाळा. कामाचे दडपण वाढेल. संयम बाळगा. |
| तूळ | उत्साहाचा अभाव राहील. जोडीदाराबरोबर कटुता येईल. खर्च हाताबाहेर जाण्याची शक्यता. |
| वृश्चिक | कष्टाचे पैशाच्या रूपाने चीज होईल. कठीण कामेही सहज पार पाडता येतील. सहकाऱ्यांची चांगली साथ मिळेल. |
| धनु | नातेसंबंध दृढ करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. नवीन नात्याचा आरंभ होण्याची शक्यता. संयम राखा. |
| मकर | घरातील सुखसोयी वाढवण्यास प्राधान्य द्याल. नोकरीत सहकाऱ्यांशी सांभाळून वागणे गरजेचे राहील. मानसिक ताणाने डोकेदुखी संभवते. |
| कुंभ | अपेक्षित फायदा होईल. दिवस खर्चिक राहील. कामे पार पाडताना अडचणी येतील. |
| मीन | अतिविचार मानसिक गोंधळ वाढवणारा ठरेल. कौटुंबिक प्रश्नावरून अनावश्यक वादाची शक्यता. नेत्रविकारापासून जपा. |

## शुभ राशी ता. १६/५/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ५ |
| १० | ६० | ५१ |
| १५ | ६५ | ५६ |
| १३७ | १६९ | १६८ |
| ४७० | २४० | २३० |

# लॉटरी

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 20 • सोडत दिनांक 15/05/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **VL-05 : 4825**

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) — **4825** — श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई (2 बक्षिसे)

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **8372** — श्री गणेश एन्टरप्रायझेस - दादर, मुंबई (2 बक्षिसे)

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 2262 | 3329 | 4049 | 4142 | 5277 | 7666 | 8117 | 8682 | 9300 | 9789 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0090 | 0889 | 1010 | 1902 | 2480 | 4340 | 4884 | 5039 | 7374 | 8446 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0922 | 2215 | 2277 | 2344 | 2376 | 6265 | 6604 | 8439 | 8459 | 9769 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1482 | 2089 | 2548 | 3767 | 4456 | 4901 | 5749 | 6847 | 7874 | 8394 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1116 | 1962 | 2489 | 3313 | 4034 | 4534 | 5398 | 6403 | 7192 | 7833 | 8696 | 9383 |
| | | 1118 | 2025 | 2530 | 3331 | 4048 | 4612 | 5413 | 6439 | 7257 | 7869 | 8699 | 9407 |
| | | 1141 | 2026 | 2534 | 3333 | 4064 | 4639 | 5415 | 6446 | 7270 | 7902 | 8715 | 9412 |
| | | 1154 | 2027 | 2544 | 3347 | 4078 | 4645 | 5417 | 6479 | 7273 | 7915 | 8731 | 9507 |
| | | 1171 | 2032 | 2552 | 3362 | 4084 | 4646 | 5418 | 6517 | 7276 | 7975 | 8751 | 9539 |
| 0040 | 0514 | 1177 | 2088 | 2607 | 3375 | 4095 | 4647 | 5425 | 6522 | 7279 | 7978 | 8783 | 9550 |
| 0041 | 0529 | 1179 | 2093 | 2616 | 3381 | 4096 | 4679 | 5429 | 6565 | 7295 | 8006 | 8784 | 9573 |
| 0046 | 0545 | 1183 | 2122 | 2627 | 3384 | 4104 | 4691 | 5448 | 6618 | 7347 | 8035 | 8786 | 9581 |
| 0052 | 0553 | 1187 | 2126 | 2721 | 3398 | 4138 | 4706 | 5458 | 6631 | 7351 | 8065 | 8813 | 9589 |
| 0061 | 0564 | 1193 | 2131 | 2723 | 3409 | 4152 | 4745 | 5508 | 6636 | 7353 | 8079 | 8850 | 9603 |
| 0068 | 0611 | 1195 | 2172 | 2728 | 3411 | 4154 | 4789 | 5509 | 6645 | 7377 | 8092 | 8863 | 9609 |
| 0078 | 0633 | 1211 | 2185 | 2749 | 3436 | 4178 | 4824 | 5515 | 6653 | 7378 | 8133 | 8870 | 9630 |
| 0082 | 0634 | 1218 | 2195 | 2762 | 3472 | 4201 | 4843 | 5530 | 6674 | 7422 | 8147 | 8876 | 9638 |
| 0085 | 0640 | 1231 | 2216 | 2766 | 3502 | 4224 | 4868 | 5542 | 6685 | 7428 | 8155 | 8878 | 9662 |
| 0087 | 0678 | 1251 | 2218 | 2775 | 3523 | 4225 | 4909 | 5546 | 6691 | 7475 | 8176 | 8886 | 9695 |
| 0097 | 0703 | 1261 | 2219 | 2791 | 3533 | 4235 | 4911 | 5548 | 6703 | 7487 | 8198 | 8888 | 9696 |
| 0099 | 0709 | 1282 | 2223 | 2799 | 3553 | 4257 | 4954 | 5565 | 6709 | 7514 | 8286 | 8890 | 9704 |
| 0153 | 0746 | 1298 | 2224 | 2807 | 3563 | 4258 | 4969 | 5663 | 6726 | 7521 | 8297 | 8931 | 9743 |
| 0154 | 0747 | 1306 | 2226 | 2811 | 3585 | 4310 | 4984 | 5712 | 6760 | 7573 | 8338 | 8961 | 9793 |
| 0206 | 0773 | 1311 | 2232 | 2832 | 3586 | 4318 | 5006 | 5719 | 6763 | 7576 | 8430 | 8974 | 9794 |
| 0210 | 0803 | 1314 | 2238 | 2862 | 3605 | 4340 | 5010 | 5759 | 6782 | 7607 | 8438 | 8982 | 9795 |
| 0240 | 0804 | 1328 | 2246 | 2882 | 3671 | 4345 | 5013 | 5772 | 6796 | 7634 | 8451 | 9030 | 9809 |
| 0250 | 0805 | 1401 | 2249 | 2898 | 3672 | 4347 | 5024 | 5793 | 6871 | 7658 | 8478 | 9031 | 9829 |
| 0257 | 0829 | 1412 | 2251 | 2903 | 3723 | 4359 | 5025 | 5853 | 6916 | 7692 | 8487 | 9034 | 9839 |
| 0281 | 0889 | 1447 | 2262 | 2908 | 3739 | 4401 | 5050 | 5906 | 6929 | 7703 | 8505 | 9039 | 9863 |
| 0304 | 0909 | 1451 | 2282 | 2967 | 3748 | 4403 | 5055 | 5925 | 6943 | 7716 | 8512 | 9059 | 9864 |
| 0346 | 0927 | 1510 | 2285 | 2972 | 3753 | 4409 | 5075 | 5959 | 6968 | 7717 | 8519 | 9071 | 9871 |
| 0356 | 0974 | 1514 | 2296 | 3020 | 3777 | 4412 | 5133 | 5973 | 6986 | 7718 | 8530 | 9093 | 9891 |
| 0364 | 0985 | 1525 | 2297 | 3086 | 3808 | 4425 | 5152 | 5978 | 7004 | 7720 | 8534 | 9103 | 9893 |
| 0388 | 1012 | 1601 | 2315 | 3106 | 3822 | 4428 | 5205 | 5983 | 7027 | 7753 | 8547 | 9107 | 9907 |
| 0402 | 1021 | 1612 | 2339 | 3159 | 3833 | 4429 | 5209 | 5988 | 7069 | 7759 | 8569 | 9186 | 9916 |
| 0403 | 1025 | 1615 | 2354 | 3175 | 3894 | 4430 | 5212 | 6037 | 7072 | 7773 | 8572 | 9191 | 9920 |
| 0413 | 1026 | 1624 | 2375 | 3203 | 3935 | 4439 | 5216 | 6067 | 7075 | 7776 | 8582 | 9192 | 9924 |
| 0424 | 1035 | 1719 | 2379 | 3233 | 3943 | 4454 | 5221 | 6074 | 7079 | 7777 | 8605 | 9259 | 9938 |
| 0434 | 1072 | 1793 | 2392 | 3235 | 3953 | 4473 | 5244 | 6148 | 7104 | 7778 | 8612 | 9269 | 9942 |
| 0437 | 1075 | 1798 | 2422 | 3239 | 3971 | 4491 | 5253 | 6182 | 7122 | 7794 | 8650 | 9277 | 9962 |
| 0457 | 1079 | 1819 | 2425 | 3243 | 3983 | 4496 | 5255 | 6259 | 7158 | 7797 | 8663 | 9281 | 9966 |
| 0469 | 1088 | 1918 | 2427 | 3249 | 4002 | 4500 | 5278 | 6260 | 7168 | 7798 | 8681 | 9328 | 9968 |
| 0476 | 1104 | 1919 | 2444 | 3264 | 4024 | 4516 | 5335 | 6261 | 7174 | 7807 | 8687 | 9335 | 9969 |
| 0479 | 1115 | 1933 | 2446 | 3266 | 4029 | 4517 | 5351 | 6360 | 7188 | 7817 | 8688 | 9374 | 9982 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता • सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 15/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **MG-05 : 2906**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **1726**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **7833** — नीलम लॉटरी - परभणी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0597 | 2086 | 3998 | 4224 | 4232 | 6305 | 6420 | 7538 | 8332 | 8915 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 2460 | 2526 | 2878 | 3130 | 4148 | 4871 | 5064 | 7888 | 8454 | 8536 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0267 | 1488 | 1616 | 3344 | 4659 | 4835 | 6241 | 7692 | 8099 | 8429 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 0945 | 1954 | 3011 | 3630 | 5154 | 5956 | 6848 | 7970 | 9013 |
| | | 1018 | 1979 | 3063 | 3771 | 5191 | 5982 | 6949 | 8173 | 9094 |
| | | 1057 | 2031 | 3083 | 3802 | 5365 | 6006 | 6969 | 8186 | 9170 |
| 0000 | 0318 | 1094 | 2042 | 3163 | 3813 | 5415 | 6024 | 6978 | 8195 | 9215 |
| 0024 | 0433 | 1099 | 2120 | 3166 | 3873 | 5431 | 6056 | 7077 | 8196 | 9296 |
| 0025 | 0471 | 1121 | 2164 | 3194 | 3887 | 5489 | 6079 | 7154 | 8243 | 9309 |
| 0039 | 0486 | 1150 | 2212 | 3288 | 3913 | 5500 | 6282 | 7162 | 8318 | 9416 |
| 0047 | 0490 | 1157 | 2251 | 3293 | 3941 | 5519 | 6302 | 7170 | 8413 | 9421 |
| 0050 | 0506 | 1192 | 2279 | 3308 | 3944 | 5521 | 6332 | 7181 | 8452 | 9496 |
| 0064 | 0510 | 1204 | 2285 | 3317 | 4044 | 5531 | 6336 | 7267 | 8569 | 9665 |
| 0071 | 0568 | 1211 | 2295 | 3324 | 4056 | 5550 | 6345 | 7270 | 8606 | 9666 |
| 0107 | 0600 | 1276 | 2345 | 3343 | 4184 | 5655 | 6346 | 7318 | 8729 | 9758 |
| 0147 | 0616 | 1336 | 2369 | 3361 | 4240 | 5675 | 6359 | 7320 | 8803 | 9815 |
| 0158 | 0627 | 1366 | 2413 | 3362 | 4257 | 5732 | 6367 | 7386 | 8807 | 9887 |
| 0180 | 0686 | 1487 | 2470 | 3363 | 4314 | 5743 | 6378 | 7576 | 8843 | 9900 |
| 0209 | 0695 | 1523 | 2604 | 3397 | 4354 | 5786 | 6486 | 7598 | 8858 | 9901 |
| 0232 | 0774 | 1573 | 2639 | 3440 | 4569 | 5815 | 6492 | 7704 | 8885 | 9967 |
| 0240 | 0876 | 1609 | 2873 | 3451 | 4641 | 5858 | 6619 | 7760 | 8890 | 9976 |
| 0270 | 0882 | 1675 | 2881 | 3506 | 4877 | 5865 | 6653 | 7763 | 8901 | 9979 |
| 0286 | 0908 | 1797 | 2932 | 3559 | 4951 | 5898 | 6687 | 7825 | 8919 | 9989 |
| 0310 | 0925 | 1926 | 2943 | 3595 | 5051 | 5923 | 6768 | 7851 | 8990 | 9995 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र सह्याद्री • राजलक्ष्मी विकली लॉटरी •

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत सायं. 4:30 वाजता • सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 15/05/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- — **SR-01 : 9890**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0521 | 1330 | 2217 | 4039 | 5595 (पवार लॉटरी, ठाणे) | 7884 | 8192 | 8988 | 9086 | 9718 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0103 | 0382 | 3466 | 3793 | 4164 | 4314 | 4504 | 4614 | 5933 | 9823 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2923 | 3194 | 6802 | 6857 | 7393 | 8418 | 9230 | 9444 | 9550 | 9576 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0856 | 1838 | 2459 | 4094 | 4984 | 6196 | 7654 | 8804 |
| | 1130 | 1891 | 2556 | 4165 | 5027 | 6433 | 7760 | 8889 |
| 0091 | 1138 | 1914 | 2793 | 4178 | 5210 | 6481 | 7777 | 8983 |
| 0121 | 1195 | 2028 | 2808 | 4302 | 5300 | 6606 | 7812 | 9145 |
| 0153 | 1200 | 2042 | 2929 | 4433 | 5360 | 6629 | 7934 | 9305 |
| 0178 | 1350 | 2110 | 3034 | 4441 | 5435 | 6648 | 7978 | 9389 |
| 0203 | 1366 | 2186 | 3262 | 4483 | 5520 | 6677 | 8068 | 9478 |
| 0210 | 1369 | 2223 | 3356 | 4485 | 5545 | 6932 | 8094 | 9509 |
| 0226 | 1578 | 2243 | 3449 | 4504 | 5625 | 6986 | 8259 | 9738 |
| 0296 | 1637 | 2289 | 3586 | 4584 | 5755 | 7440 | 8281 | 9799 |
| 0404 | 1675 | 2374 | 3722 | 4803 | 5765 | 7493 | 8307 | 9897 |
| 0470 | 1797 | 2417 | 3936 | 4916 | 5794 | 7534 | 8456 | 9921 |
| 0707 | 1805 | 2425 | 4051 | 4924 | 5927 | 7578 | 8588 | 9964 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी • सोडत संध्या. 4:45 वाजता • सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 20 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 15/05/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-02 : 4394**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0126 | 2075 | 2569 | 5866 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 7215 | 7818 | 8006 | 9391 | 9486 | 9756 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0641 | 0668 | 1887 | 1896 | 2492 | 6016 | 6267 | 7168 | 7852 | 8678 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 2757 | 2843 | 3546 | 4233 | 5410 | 5681 | 6689 | 7247 | 8175 | 8315 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0031 | 0711 | 1026 | 1138 | 2268 | 4371 | 4845 | 5074 | 8584 | 9047 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1861 | 2728 | 3543 | 4674 | 5548 | 6181 | 6763 | 7691 | 8484 | 9319 |
| | | 2153 | 2761 | 3636 | 4721 | 5552 | 6306 | 6799 | 7734 | 8581 | 9388 |
| 0041 | 0980 | 2220 | 2823 | 3736 | 4741 | 5559 | 6312 | 6805 | 7736 | 8644 | 9398 |
| 0056 | 0985 | 2223 | 2824 | 3805 | 4746 | 5595 | 6360 | 6836 | 7769 | 8651 | 9543 |
| 0060 | 1015 | 2227 | 2935 | 3873 | 4871 | 5599 | 6426 | 6866 | 7777 | 8687 | 9547 |
| 0061 | 1071 | 2235 | 2971 | 3874 | 5014 | 5649 | 6447 | 6874 | 7786 | 8734 | 9558 |
| 0089 | 1108 | 2293 | 2974 | 3921 | 5049 | 5655 | 6476 | 6881 | 7867 | 8740 | 9571 |
| 0098 | 1144 | 2298 | 3084 | 3949 | 5095 | 5683 | 6516 | 6929 | 7978 | 8785 | 9591 |
| 0140 | 1160 | 2312 | 3134 | 3975 | 5097 | 5705 | 6553 | 7001 | 7986 | 8794 | 9598 |
| 0200 | 1181 | 2342 | 3150 | 3976 | 5155 | 5708 | 6559 | 7025 | 8007 | 8814 | 9609 |
| 0209 | 1377 | 2431 | 3207 | 3991 | 5205 | 5805 | 6610 | 7091 | 8060 | 8815 | 9662 |
| 0211 | 1400 | 2474 | 3239 | 4022 | 5311 | 5854 | 6611 | 7198 | 8090 | 8838 | 9730 |
| 0378 | 1418 | 2527 | 3332 | 4082 | 5353 | 5910 | 6617 | 7270 | 8143 | 8881 | 9738 |
| 0383 | 1471 | 2529 | 3333 | 4087 | 5395 | 5964 | 6638 | 7275 | 8168 | 8883 | 9815 |
| 0404 | 1548 | 2532 | 3339 | 4101 | 5426 | 5987 | 6662 | 7292 | 8236 | 8961 | 9842 |
| 0487 | 1551 | 2592 | 3350 | 4433 | 5440 | 6000 | 6668 | 7355 | 8370 | 9107 | 9849 |
| 0502 | 1613 | 2621 | 3370 | 4477 | 5454 | 6078 | 6691 | 7377 | 8375 | 9130 | 9855 |
| 0601 | 1618 | 2630 | 3392 | 4481 | 5456 | 6079 | 6698 | 7456 | 8378 | 9145 | 9904 |
| 0602 | 1685 | 2635 | 3395 | 4502 | 5505 | 6104 | 6713 | 7492 | 8388 | 9169 | 9914 |
| 0650 | 1710 | 2679 | 3433 | 4546 | 5524 | 6105 | 6719 | 7499 | 8399 | 9219 | 9959 |
| 0722 | 1711 | 2691 | 3523 | 4576 | 5526 | 6174 | 6727 | 7600 | 8449 | 9315 | 9990 |
| 0951 | 1768 | 2722 | 3541 | 4648 | 5535 | 6177 | 6758 | 7674 | 8472 | 9318 | 9991 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी





**तुझा नंबर कितवा आहे? एका प्रेताने शेजारच्या दुसऱ्या प्रेताला विचारलं. माहीत नाही, दुसऱ्या प्रेताने बेफिकिरीने उत्तर दिलं. कितव्या नंबरला होत आहे तुझं क्रियाकर्म? अरे, माहीत नाही म्हटलं तरीही तेच, तुला अंतिम संस्काराची घाई कसली आहे सांग? जिवंत होतास तेव्हा तर तासन्तास रेशन, तिकीट, बँकेच्या लायनीत उभा राहायचा तू. आज काय झालं?**

त्या लाईनमध्ये मी स्वतः उभा असायचो, आज मुलं आहेत लाईनमध्ये उभी. एक काम कर, उभा हो आणि या सर्वांना धडा शिकव. बघ पटकन नंबर येईल. जेव्हा उभा राहू शकत होतो तेव्हा नाही कोणाच्याच विरोधात आवाज उठवला, त्यावेळीच जर आवाज उठवला असता तर!...

मग आता शांत पडून राहा. तोंड बंद करून जगण्याची हीच शिक्षा असते. असाही माणूस तेव्हाच मेलेला असतो जेव्हा तो तोंड बंद करून जगत असतो. तू कसा मेलास? एकाने दुसऱ्याला विचारलं. ऑक्सिजन न मिळाल्याने. आणि तू कसा मेलास? मला तर हॉस्पिटलमध्ये बेडच नाही मिळाला.

किती तुच्छ मरण मेलोय ना आपण? पहिलं प्रेत सुस्कारा सोडत म्हणालं. आपल्या सोबत असंच व्हायला हवं होतं भावा. जसे गपचूप मरून गेलो आपण तसंच आता आपल्या प्रेताचा अंतिम संस्कार होण्याची गपचूप वाट बघू. मला एकदाच जिवंत होण्याची संधी मिळाली तर मी ओरडून ओरडून जगाला सांगेन की आम्हाला सिस्टमने मारलंय. आम्ही तितकेही आजारी नव्हतो जितकी सिस्टिम पोखरली गेली होती. एका प्रेताने वैतागून दुसऱ्याला सांगितलं.

गपचूप पडून राहा मेल्या. प्रेतं बोलत नसतात. हा देशही मेलेल्यांचाच आहे. जेव्हा जिवंत होतो तेव्हाही आम्ही मेलेलोच तर होतो. मग आता हेकडी दाखवून उपयोग काय? मित्रा किती प्रेतं जाळली आणि बाकी किती आहेत लायनीत? एका प्रेताने दुसऱ्याला विचारलं. ७ झालेत आणि २७ बाकी आहेत. जरा बघ की आजूबाजूला किती प्रेतं पडलीत. किती वाईट अवस्था झाली आहे रे आपल्या देशाची. पहिलं प्रेत रडवेलं होऊन बोलत होतं.



दिसली का देशाची अवस्था? आता चितांच्या आगीची उंची मोज आणि देशाच्या प्रगतीची उंची समजून घे. बघ, देशात चारी बाजूने महामारी पसरली आहे... वातावरणातही द्वेष पसरवला गेलाय. अशा वातावरणात आपली मुलं कशी जगतील बरं? हो. पण हे सर्व होऊ नाही म्हणून आपण केलं तरी काय? खरंच, काही नाही केलं. मग एक काम करूया स्वतःलाच बोल लावून घेऊया आणि पुन्हा मरून जावूया...गपचूप जळून जाऊया.

**- नितेश शेलार**

# भारताच्या रक्षणासाठी प्रभादेवीत रविवारी श्री राजमातंगी महायज्ञ

मुंबई

**सध्याच्या** युद्धजन्य परिस्थितीमुळे भारताला संरक्षण कवच लाभावे आणि देशाची सर्वांगीण अभिवृद्धी व्हावी, या उद्देशाने सनातन संस्थेच्यावतीने श्री राजमातंगी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महायज्ञ रविवारी, १७ मे रोजी प्रभादेवी येथे पार पडणार आहे. मुंबईत प्रथमच सनातन संस्थेच्या वतीने इतक्या मोठ्या प्रमाणावर महायज्ञ आयोजित करण्यात येत आहे. प्रभादेवी येथील सिद्धिविनायक मंदिराच्या पाठीमागील नर्दुल्ला टँक मैदानावर होणार आहे. रविवारी दुपारी ३.३० ते सायंकाळी ७.३० या वेळेत हा महायज्ञ आयोजित करण्यात आला आहे. भारताचे संरक्षण, लोककल्याण आणि देशात सकारात्मक ऊर्जा निर्माण व्हावी, या हेतूने महायज्ञाचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# इंधन बचतीसाठी महावितरणचे ईव्ही वाहनांना प्राधान्य

मुंबई



**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचतीच्या आवाहनाला महावितरणने कृतीतून प्रतिसाद देत हरित ऊर्जेकडे पाऊल टाकले आहे.

पेट्रोल आणि डिझेल वाहनांऐवजी आता महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विद्युत वाहनांचा वापर सुरू करण्यात आला आहे. यामध्ये महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांच्यासह सर्व संचालक आणि कार्यकारी संचालकांचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या 'विद्युत वाहन धोरण २०२५'ला अनुसरून महावितरणने पर्यावरणपूरक आणि इंधन बचतीस प्राधान्य देणारा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, महावितरणच्या मुख्य व्यवस्थापनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विद्युत वाहनांच्या खरेदीची प्रक्रिया पहिल्या टप्प्यात पूर्ण करण्यात आली. नव्याने उपलब्ध झालेल्या ईव्ही वाहनांचा वापरही आता सुरू झाला आहे.

# नागपूर जि. प. कर्मचारी दर सोमवारी सार्वजनिक वाहनांचा वापर करणार

नागपूर

**इंधन** बचत आणि काटकसरीच्या उपाययोजनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूर जिल्हा परिषदेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. येत्या सोमवारी, १८ मेपासून जिल्हा परिषदेचे सर्व कर्मचारी दर सोमवारी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच इंधन वापर कमी करण्याचा उद्देश या निर्णयामागे आहे. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी हे स्वतः पुढाकार घेत घरापासून कार्यालयापर्यंत पायी प्रवास करणार आहेत. त्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्येही सकारात्मक संदेश जाण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दर सोमवारी सार्वजनिक वाहनांचा वापर केल्याने वाहतूक कोंडी कमी होण्यास, प्रदूषणावर आळा बसण्यास आणि इंधनाची बचत होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# भंडाऱ्यात कारधा वैनगंगा नदीवर काँग्रेसचे जलसमाधी आंदोलन

भंडारा

**भंडारा** आणि गोंदिया जिल्ह्यातील शेतकरी तसेच प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेसच्या वतीने वैनगंगा नदीत जलसमाधी आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेसचे नेते नाना पटोले यांच्यासह खासदार डॉ. प्रशांत पडोळे आणि खासदार नामदेव किरसान सहभागी झाले होते.

या आंदोलनात शेतकरी, प्रकल्पग्रस्त आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलकांनी सांगितले. शेतीमालाला योग्य दर मिळावा, धान खरेदी केंद्रावरील मर्यादा वाढवावी, धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना बोनस द्यावा, बेरोजगारांचे प्रश्न सोडवावेत, तसेच प्रकल्पग्रस्तांच्या समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. आंदोलनामुळे वैनगंगा नदी परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ओमान समुद्रात भारताचे मालवाहू जहाज बुडाले

नवी दिल्ली

**आखाती** भागात सुरू असलेल्या युद्धाचा फटका ओमानच्या समुद्रातील एका भारतीय मालवाहू जहाजाला बसला. या जहाजावर हल्ला झाला, ज्यात त्याला आग लागून ते समुद्रात बुडाले. मात्र, या जहाजावरील सर्व १४ खलाशांना ओमानच्या तटरक्षक दलाने सुरक्षित वाचवले. सोमालियाहून शारजाकडे जात असलेले 'हाजी अली' हे भारतीय लाकडी मालवाहू जहाज पहाटे ओमानच्या सागरी हद्दीत असताना त्यावर हल्ला झाला. या हल्ल्यानंतर जहाजाला आग लागली आणि काही वेळातच ते समुद्रात बुडाले. जहाजावर एकूण १४ खलाशी होते.

# गुन्ह्याशी थेट संबंध असल्याशिवाय बँक खाती गोठवू शकत नाही

मुंबई

**गुन्ह्याशी** थेट संबंध असल्याशिवाय पोलिसांना कोणतेही बँक खाते गोठवता येणार नाही. पोलिसांना तसा अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आणि तपास यंत्रणेला चपराक लगावली. 'गीता कंपनी विरुद्ध महाराष्ट्र सरकार' या खटल्याची सुनावणी करताना न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला.

तक्रारदार पराग शाह यांनी आरोपींवर शेअर्स आणि स्टॉक हस्तांतरित करून फसवणूक केल्याचा आरोप केला होता. या तपासादरम्यान आर्थिक गुन्हे शाखेने आरोपी गीता कंपनी यांची बँक खाती आणि म्युच्युअल फंड युनिट्स फ्रीज केले होते. या प्रकरणात दंडाधिकारी न्यायालयाने गीता कंपनी यांची खाती अन-फ्रीज करण्यासाठी ६.५५ कोटी रुपयांची बँक गॅरंटी देण्याची अट घातली होती. त्यावर आक्षेप घेत गीता कंपनी यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. त्यांच्या याचिकेवर सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने संबंधित अट अत्यंत जाचक व अन-फ्रीज करण्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासणारी असल्याचे निरीक्षण नोंदवले. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १०२ अंतर्गत केवळ संशयाच्या आधारे कोणतीही मालमत्ता किंवा बँक खाते गोठवण्याचा अधिकार तपास यंत्रणेला नाही. जप्त केलेली मालमत्ता आणि कथित गुन्हा यामध्ये थेट संबंध असणे अनिवार्य आहे, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती एन. जे. जमादार यांच्या खंडपीठाने ६.५५ कोटी रुपयांच्या बँक गॅरंटीची अट बदलून त्याऐवजी केवळ 'इंडेंनिटी बॉण्ड' (नुकसानभरपाई बंधपत्र) सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**न्यायालयाचे खडे बोल**

तपास यंत्रणांनी दिवाणी न्यायालयासारखे काम करून वसुली किंवा नुकसानभरपाई देण्याचा प्रयत्न करू नये. गुन्हा आणि मालमत्तेचा थेट संबंध सिद्ध न झाल्यास आरोपीच्या मालमत्तेचा हक्क हिरावून घेणे चुकीचे आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# एमएमआरडीएचे शिवशाहीला साकडे! प्रकल्पग्रस्तांसाठी घरे द्या

मुंबई

**एमएमआरडीएने** प्रकल्पग्रस्तांसाठी बोरिवलीतील ३२५ घरे विकत देण्याची मागणी शिवशाही पुनर्वसन प्रकल्प कार्यालयाकडे केली आहे. मात्र येथील घरे आमची नसल्याने ती देता कशी येतील? अशा बुचकळ्यात शिवशाही पडली आहे.

ठाणे-बोरिवली टिकुजीनीवाडी येथील टनेल प्रकल्पअंतर्गत बाधितांसाठी एमएमआरडीएने शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची पीटीसीची ३२५ घरे भाडेतत्त्वावर घेतली आहेत. भविष्यात इतर प्रकल्पबाधितांसाठी एमएमआरडीएला घरांची गरज भासू शकते. या दृष्टीने सध्यस्थितीत भाडेतत्त्वावर ताब्यात असलेल्या ३२५ घरांचे अंदाजे ४० कोटी ६२ लाख रुपये भरणा करून ही घरे विकत देण्याची मागणी एमएमआरडीएकडून करण्यात आली आहे, असे सांगून शिवशाहीतील एक अधिकारी म्हणाला मुळात या घरांची मालकी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे आहे. शिवशाही फक्त केअरटेकर असल्याने आम्ही एमएमआरडीए कडून घरांचे भाडे घेतो. त्यामुळे घरांच्या विक्रीचा निर्णय शिवशाहीच्या अखत्यारित येत नाही. एमएमआरडीएचा प्रवास रॉंग साईटचा आहे.

# मागणी करूनही म्हाडाला दुरुस्ती फंड नाही

मुंबई




**दक्षिण** मुंबईत म्हाडाच्या १२,५०० हजार सेस इमारती आहेत. यांच्या दुरुस्तीसाठी दोनशे कोटींचा फंड शासनाने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करूनही फंडाची तरतूद होत नसल्याने लागणाऱ्या फंडासाठी प्राधिकरणाकडून पैशांची उसनेवारी घ्यावी लागते, अशी माहिती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातून देण्यात आली.

पुढे असे सांगण्यात आले की, सेस इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांच्या भाडेपट्टीतून वर्षाला ४० कोटी रुपयांचा सेस शासनाकडे जमा होतो. त्यात पालिका प्रशासन १० कोटी रुपये देते. म्हाडा १० कोटी आणि राज्य शासन ४० कोटी रुपये देते, असे मिळून १०० कोटी रुपये शासनाच्या तिजोरीत जमा होणे अपेक्षित असते. पण जेमतेम ७० कोटी जमा होतात. त्यामुळे सेस इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून म्हाडाला मिळणारा निधी अपुरा पडत आहे. त्यासाठी शासनाने दोनशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ शासनाकडे सातत्याने करते, पण मागणीला केराची टोपली दाखविली जाते.

# गँगस्टर मिरचीच्या वरळीतील इमारतींवर ईडीची नव्याने जप्ती

मुंबई

**गँगस्टर** इकबाल मेमन उर्फ इकबाल मिरची याच्याशी संबंधित वरळीतील तीन इमारतींवर अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) आता फरार आर्थिक गुन्हेगार कायद्यान्वये (एफईओ) जप्तीची कार्यवाही सुरू केली आहे. याआधी या इमारती ईडीने मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये जप्त केल्या आहेत. न्यायालयाच्या परवानगीने आता ईडी या इमारती एफईओ कायद्यान्वये जप्त करणार आहे. एफईओ कायद्याने एखाद्या गुन्हेगाराला फरार आर्थिक गुन्हेगार घोषित करण्यात आल्यानंतर त्याच्या मालमत्तेवर जप्ती आणताना सरकारला व्यापक अधिकार प्राप्त होतात. सरकार या मालमत्ता अन्य कोणत्याही कामासाठी वापरू शकते किंवा प्रसंगी या मालमत्ता लिलावात विकून महसूल उभा करू शकते. म्हणून या कार्यवाहीला महत्त्व आहे.

# 'अदानी'चा 'आयएचजी'शी करार देशात ५ नवी हॉटेल उभारणार



मुंबई

**अदानी** एअरपोर्ट्स होल्डिंग्ज लिमिटेड आणि आयएचजी हॉटेल अँड रिसॉर्टमध्ये भारतात पाच नवी हॉटेल उभारण्यासाठी व्यवस्थापन करार केला आहे. या करारानुसार नवी मुंबई, जयपूर, मंगळुरू आणि तिरुवनंतपूरम या शहरांमध्ये हॉटेल विकसित केली जाणार आहेत. त्यामुळे एकूण सुमारे १,५०० खोल्यांची क्षमता निर्माण होणार आहे.

या भागीदारीमुळे आयएचजीचा जागतिक दर्जाचा 'किम्पटन हॉटेल्स अँड रेस्टॉरंट्स' हा आलिशान बुटीक ब्रँड भारतीय बाजारपेठेत प्रथमच प्रवेश करणार आहे. तसेच 'हॉलिडे इन' आणि 'हॉलिडे इन एक्स्प्रेस' यांसारख्या ब्रँडचाही या प्रकल्पात समावेश असेल.

देशातील विमान वाहतूक आणि पर्यटन क्षेत्राच्या वेगाने होत असलेल्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर हा करार केला आहे. विमानतळ परिसराभोवती आधुनिक आणि दर्जेदार सुविधा विकसित करून प्रवाशांसाठी सक्षम परिसंस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे.

अदानी एंटरप्रायझेस लिमिटेडचे संचालक प्रणव अदानी म्हणाले की, आंतरराष्ट्रीय ब्रँडच्या सहकार्याने जागतिक दर्जाची सेवा आणि पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा कंपनीचा प्रयत्न आहे. आयएचजी हॉटेल अँड रिसॉर्टचे आशिया विभागाचे संचालक सुदीप जैन यांनीही या करारामुळे भारतातील वाढत्या बाजारपेठेत कंपनीचे स्थान अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# व्यवस्थापकीय काम सांभाळणारे अधिकारी 'कामगार' नाहीत

**उच्च न्यायालयाचा निर्वाळा**

मुंबई

**कंपन्यांमध्ये** व्यवस्थापकीय किंवा पर्यवेक्षकीय जबाबदाऱ्या सांभाळणारे अधिकारी 'कामगार' ठरत नाहीत. ते अधिकारी 'कामगार'च्या व्याख्येत मोडत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. न्या. अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय देताना यापूर्वीचे औद्योगिक आणि कामगार न्यायालयाचे आदेश रद्दबातल ठरवले.

ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक लिमिटेड या कंपनीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. कंपनीच्या याचिकेवर न्या. अमित बोरकर यांनी सविस्तर सुनावणी घेऊन २९ पानी निकाल दिला. याचिकाकर्त्या कंपनीने २००४ मध्ये प्रतिवादी तुकाराम मेजारी यांना 'कमर्शियल ऑफिसर' पदावर बढती दिली होती. मात्र, कामातील त्रुटी आणि व्यवस्थापनाचा विश्वास गमावल्याचे कारण देत कंपनीने त्यांची सेवा खंडित केली होती. त्याविरोधात मेजारी यांनी कामगार न्यायालयात धाव घेतली होती. ठाण्याच्या कामगार आणि औद्योगिक न्यायालयाने तुकाराम मेजारी यांना 'कर्मचारी' मानत त्यांच्या बाजूने निकाल दिला होता. तसेच त्यांना थकीत वेतन व सेवेत कायम ठेवण्याचे आदेश कंपनीला दिले होते. कंपनीने कनिष्ठ न्यायालयांच्या त्या आदेशांना उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे आव्हान दिले होते. कंपनीचा युक्तिवाद उच्च न्यायालयाने मान्य केला आणि एखादी व्यक्ती कामगार आहे की नाही, हे केवळ त्याच्या पदावरून ठरत नाही, तर तो प्रत्यक्ष काय काम करतो यावरून ठरते, असे स्पष्ट केले.

# कर्नाटकातील शाळांमध्ये भगव्या शाली वापरण्यास परवानगी नाही

बंगळुरू

**प्राथमिक** शाळा ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना गळ्यात, हातात धागा, रुद्राक्ष, कुंकू-टिकली, डोक्यावर पगडी, बुरखा अशा प्रकारच्या धार्मिक वस्तू वापरण्यास परवानगी आहे. मात्र भगव्या शाली वापरण्यास परवानगी नाही, असे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केले. त्यावरून वाद होण्याची शक्यता आहे.

वर्षानुवर्षे चालत आली आहेत ती धार्मिक चिन्हे किंवा वस्तू वापरण्यास राज्यात परवानगी आहे. मात्र भगव्या शालींसारख्या नवीन वस्तू यामध्ये घुसवता येणार नाही, असे सिध्दरामय्या माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना म्हणाले. पेट्रोल-डिझेलचा कमी वापर आणि सोने खरेदी न करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाबद्दल विचारले असता सिद्धरामय्या म्हणाले की, अशा प्रकारच्या काटकसरीने मूळ प्रश्न सुटणार नाही.

# सांगलीत शक्तीपीठ महामार्गविरोधी रॅली प्रकरणी २५० जणांवर गुन्हा

सांगली

**राज्य** सरकारच्या प्रस्तावित 'शक्तीपीठ महामार्गा' विरोधात सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात काढण्यात आलेल्या जनजागृती रॅलीप्रकरणी सुमारे २५० आंदोलनकर्त्यांविरोधात ईश्वरपूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बेकायदेशीर जमाव जमवून दुचाकी रॅली काढल्याचा ठपका आंदोलनकर्त्यांवर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी सहायक पोलिस उपनिरीक्षक अरुण जंगम यांनी फिर्याद दिली आहे. शक्तीपीठ महामार्गामुळे बाधित होणाऱ्या गावांमधील शेतकऱ्यांनी गुरुवारी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग घेतला होता. वाळवा तालुका संघर्ष समिती आणि बाधित शेतकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत आमच्या सुपीक जमिनी देणार नाही, असा आक्रमक पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला. मसुचीवाडी, जुनेखेड, नवेखेड, वाळवा, कामेरी, येडेनिपाणी, येलूर, इटकरे, ऐतवडे खुर्द आणि कुरळप या गावांतील शेतकरी हातात झेंडे आणि महामार्गविरोधी फलक घेऊन रस्त्यावर उतरले होते. क्रांतीवीर नागनाथअण्णा नायकवडी यांच्या स्मृतिस्थळाला अभिवादन करून ही बाईक रॅली इस्लामपूरच्या दिशेने रवाना झाली.

# राजन विचारेंची याचिका फेटाळली खासदार नरेश म्हस्केंना दिलासा

नवी दिल्ली

**शिंदे** गटाचे खासदार नरेश म्हस्के यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघातील २०२४ च्या निवडणुकीतील नरेश म्हस्के यांच्या विजयाला आव्हान देत उबाठा गटाचे नेते राजन विचारे यांनी न्यायालयात धाव घेतली होती. निवडणूक प्रतिज्ञापत्रात गुन्हा लपवला असल्यामुळे म्हस्के यांची खासदारकी रद्द करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. मात्र या आरोपांमध्ये कोणतेही ठोस तथ्य नसल्याचे नमूद करत सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली. ही याचिका उच्च न्यायालयानेही फेटाळल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सर्वोच्च न्यायालयानेही ती फेटाळल्याने नरेश म्हस्के यांना मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे.

# सिंधुदुर्गातील आठ गावांवर खाण संकट! ड्रोन सर्वेक्षणाला परवानगी

**ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण**

सिंधुदुर्ग

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील आरवली, आसोली, मळेवाड, आजगाव, धाकर, सोनमुरे, सर्वलेखोल आणि बांध या निसर्गरम्य व बागायतींसाठी प्रसिद्ध गावांवर पुन्हा खाण प्रकल्पाचे संकट घोंघावू लागले आहे. जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड कंपनीला लोहखनिज खाणी सुरू करण्याच्या दृष्टीने ड्रोनआधारित भू-चुंबकीय सर्वेक्षण करण्यास सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

एकीकडे पर्यटन विकासाचे दावे करणारे शासन दुसरीकडे निसर्गाचा ऱ्हास करणाऱ्या खाण प्रकल्पांना परवानगी देत असल्याने मोठी विसंगती निर्माण झाल्याची टीका 'घुंगुरकाठी' स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष सतीश लजीत यांनी केली. भविष्यात या गावांच्या अस्तित्वावरच संकट येऊ शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने आदेश जारी करण्यात आला. त्यानुसार सावंतवाडी तालुक्यातील आजगाव, धाकर, मळेवाड तसेच वेंगुर्ले तालुक्यातील आरवली, आसोली, सोनमुरे, सर्वलेखोल आणि बांध या गावांमध्ये ११ जूनपर्यंत ड्रोनआधारित भू-चुंबकीय सर्वेक्षण करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

# रघुवीर खेडकर २५ मे रोजी पद्मश्रीने सन्मानित होणार

संगमनेर

**अवघ्या** महाराष्ट्रात तमाशा कलेच्या माध्यमातून लोकांचे मनोरंजन करणारे ज्येष्ठ कलाकार रघुवीर खेडकर यांना येत्या २५ मे रोजी पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

२५ मे रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार सोहळ्याची रंगीत तालीम होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी राष्ट्रपती भवनात ५ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्राची अस्सल लोककला अशी ओळख असलेल्या लोकनाट्य तमाशा क्षेत्रात रघुवीर खेडकर हे पद्म पुरस्कार मिळवणारे पहिले कलाकार ठरले आहेत. दिल्ली येथे होणाऱ्या पद्म पुरस्कार सोहळ्याला रघुवीर खेडकर यांचे मानस बंधू डॉ. संतोष खेडलेकर आणि व्यवस्थापक शफी शेख हे सोबत असणार आहेत.

**आईवडिलांना अर्पण**

माझे मानस बंधू डॉ. संतोष खेडलेकर यांनी आज दुपारी पद्म पुरस्काराचा ई-मेल आल्याचा फोन केला आणि माझे मन भूतकाळात गेले. माझे वडील तमाशामहर्षी तुकाराम खेडकर आणि आई कांताबाई सातारकर यांनी तमाशा क्षेत्रात घेतलेले कष्ट आठवले. स्वातंत्र्योत्तर काळात तमाशाला दिशा देण्याचे काम करणाऱ्या कलावंतांमध्ये माझ्या आईवडिलांचे मोठे योगदान होते. माझा हा पुरस्कार मी या दोघांच्या चरणी अर्पण करतो.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# पाकिस्तानचा पुळका कशासाठी ?

देशाला स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे होत आहेत. १९४७ ला झालेली देशाची फाळणी ही केवळ देशाचे तुकडे करणारी ठरली नाही तर भारताच्या सुरक्षिततेपुढे कायमचे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरली म्हणूनच आज ७७ वर्षांनंतर भारताची पाकिस्तानबरोबर सर्वाधिक युद्ध झाली. किंबहुना सगळी चारही युद्ध ही पाकिस्तानकडूनच लादली गेली. याचा अर्थ पाकिस्तानला भारताबरोबर अगदी फाळणीपासूनच संवाद नकोच होता. कायम संघर्षच हवा होता. बॅरिस्टर जिनांनीसुद्धा स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करताना देशात अनेक भागांमध्ये हिंदू-मुस्लीम दंगे घडवून आणण्यालाच प्रोत्साहन दिले होते. एवढेच नव्हे तर भारतात मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत, असादेखील वारंवार आग्रह धरला होता. पूर्णपणे विभाजनवादी, राष्ट्रविघातक मानसिकतेतूनच पाकिस्तानचा जन्म झाला. आणि तीच प्रवृत्ती गेली ७७ वर्षे कायम राहिली. या काळामध्ये झालेले दहशतवादी हल्ले आणि काश्मिरला भारतापासून तोडण्यासाठी खेळली गेलेली सगळी छुपी युद्ध ही पुन्हा भारताचे विभाजन करणारीच कारस्थानं होती. अजूनही पाकिस्तानने आपली ही दहशतवादी आणि हिंसाचारी प्रवृत्ती सोडलेली नाही. अगदी ताज्या पहलगाम हल्ल्यापासून ते दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोटापर्यंत किंवा अगदी दोन दिवसांपूर्वीच पुण्यातल्या हडपसर भागात कामधेनू रुग्णालयाजवळ सापडलेले जिवंत बॉम्बच्या प्रकारापर्यंत पाकिस्तानचे षड्यंत्र चालू असल्याचेच सिद्ध होते. एवढेच नव्हे तर गेल्या काही वर्षात लव्ह जिहादच्या माध्यमातून सुरू झालेले धर्मांतराचे षड्यंत्र भारतातल्या धर्मांध प्रवृत्तीचेच निदर्शक ठरते. इथल्या सामान्य मुस्लिमांशी जिथे संवाद साधणे कठीण होते तिथे पाकिस्तानमधल्या सर्वसामान्य माणसांबरोबर संवाद किंवा चर्चा करण्याची राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची भूमिका आश्चर्यकारक म्हणावी लागेल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहकार्यवाह दत्तात्रय होस्बाले यांनी पाकिस्तानबरोबरची चर्चेची द्वारे खुली ठेवावीत, असे विधान केले आहे. ते काहीसे धक्कादायकच ठरते. हा सगळा प्रकार म्हणजे पाकिस्तानचे अनावश्यक लाड किंवा त्या फुटीरतावादी मानसिकतेला महत्त्व देण्याचाच प्रकार ठरतो. संघाला पाकिस्तानबरोबर चर्चा करण्याचा हा पुळका येण्याचे नेमके कारण काय हेदेखील समजले पाहिजे. आज भारताच्या प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये पाकिस्तानविरोधात प्रचंड संताप, राग आणि असंतोष आहे. हा देश कोणत्याही प्रकारचे संबंध ठेवण्याच्या लायकीचा नाही. कारण या देशाला अशा मूलभूत प्रयत्नांचे महत्त्वही कळत नाही आणि काही किंमतही वाटत नाही.

**संवादाची लायकी नसलेला देश**

यातील गांभीर्याचा विषय असा आहे की, गेल्या ७७ वर्षांत भारताने नेहमीच चर्चा संवाद याच मार्गांचा अवलंब केला. अगदी वाजपेयींच्या काळातही लाहोर बस डिप्लोमसी हा अतिशय मौलिक प्रयत्न केला गेला होता. त्यापाठोपाठ दहा वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदींनी त्यावेळचे पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरिफ यांच्या घरी जाऊन संबंध सुधारण्याचे कृतीशील प्रयत्न केले होते. परंतु त्यानंतरच्या काही दिवसांतच पाकिस्तानने कारगिलमध्ये घुसखोरी करून भारतावर युद्ध लादले. यामध्ये आपल्या चारशे सैनिकांना हौतात्म्य पत्करावे लागले. आतापर्यंत काही हजार सैनिकांना या पाकिस्तानच्या दौऱ्याचे बळी व्हावे लागले आहे. शिवाय देशभरात किमान दहा हजार निष्पाप नागरीकांना दहशतवादी हल्ल्यांमध्ये जीव गमवावे लागले आहेत. गेल्या ७७ वर्षांतल्या पाकिस्तानच्या या क्रौर्याचे शेकडो प्रकार भारत अनुभवत आला आहे. २६/११ चा मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला हा तर भारतात घुसून दोनशे लोक मारण्याचा सर्वात धक्कादायक प्रकार होता. त्यावेळीसुद्धा भारताने संयमाची भूमिका घेतली आणि युद्ध टाळून संवाद साधण्याचाही प्रयत्न केला होता. परंतु त्याला यश आले नाही. आपल्या नसानसामध्ये क्रूरता भिनलेल्या या देशाशी खूप सौहार्दपूर्ण संबंध कधीच निर्माण होऊ शकणार नाहीत. उलट 'ठकासी व्हावे महाठक' या न्यायाने पाकिस्तानला वठणीवर आणता येऊ शकते. अगदी अलिकडच्या पहलगाम हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींनी राबवलेले ऑपरेशन सिंदूर हीच पाकिस्तानच्या क्रूरपणावरचे उत्तर ठरते. आंतरराष्ट्रीय राजकारणात किंवा परराष्ट्रीय धोरणांमध्ये संवाद किंवा चर्चेला नेहमीच प्राधान्य असते याची जाणीव पंतप्रधान मोदींना आणि उत्कृष्ट परराष्ट्र धोरण राबवणाऱ्या परराष्ट्र मंत्री जयशंकर यांना आहे. अशा परिस्थितीत पाकिस्तानबरोबर किमान पुढची दहा वर्षे तरी चर्चा वगैरे करण्याची गरज उरत नाही. उलट पाकव्याप्त काश्मीर मिळवण्यासाठी भारताने अधिक आक्रमक होण्याची गरज आहे. संवादातून काही साध्य होणार नाही आणि पाकिस्तानच्या क्रौर्याला संघर्षाशिवाय दुसरा पर्याय नाही.

**अडवाणींच्या विधानाला झालेला विरोध**

गेल्या दहा वर्षांतसुद्धा ऊरी, पठाणकोट या लष्करी तळांवरचे अत्यंत भयंकर हल्ले आणि आताचा धर्म विचारून हिंदू पर्यटकांना गोळ्या घालण्याचा क्रूरपणा हा पाकिस्तानबरोबरचे सगळे संबंध संपुष्टात आणण्याचा शेवटचा प्रकार होता. म्हणूनच पंतप्रधान मोदींना पाकिस्तानला होणारा सिंधू नदीचा पाणीपुरवठा बंद करण्याची घोषणा करावी लागली. पाकिस्तानबरोबरचे आर्थिक संबंध तोडावे लागले. आजही पाकिस्तानच्या क्रिकेटपटूंना भारतात पाय ठेवू द्यायचा नाही अशीच लोकांची मानसिकता आहे. ज्या काश्मीर फाईल्स चित्रपटात काश्मिरी पंडितांचे भयंकर हाल याच पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादाने केल्याचे लोकांना पाहायला मिळाले. लाखो काश्मिरी पंडितांना आपली जन्मभूमी सोडून निर्वासित व्हावे लागले. ज्या काश्मिरला देशाचे नंदनवन समजले जाते. ते काश्मीर गेली चाळीस वर्षे हिंसाचार आणि दहशतीच्या आगीत अक्षरशः होरपळून निघाले अशा एक ना अनेक वेदनांचे चटके भारताने सहन केलेले आहेत. त्या देशाबरोबर चर्चा करण्याचे कारण उरत नाही. लालकृष्ण अडवाणी ज्यावेळी पाकिस्तानच्या दौऱ्यावर गेले होते त्यावेळी जिना हे राष्ट्रवादी नेते होते. अशा प्रकारचे विधान केले त्यांच्या या विधानावर समस्त संघ परिवाराने प्रचंड संताप व्यक्त केला होता. गेल्याच आठवड्यात पाकिस्तानचे लष्कर प्रमुख मुनिर यांनी जाहीरपणे भारताला कायमचा धडा शिकवून असे प्रक्षोभक विधान केले होते. असे विषारी फुत्कार टाकणाऱ्या सापांशी संवाद होऊ शकत नाही. त्यांना त्यांच्या पापांची संघर्षातूनच कठोर शिक्षा दिली पाहिजे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

काळजी करणारी माणसं मिळायला भाग्य लागतं.
पण अशी माणसं आपल्याला मिळाली आहेत
हे समजायला जास्त भाग्य लागतं.

## पंचांग

**शनिवार, १६ मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** वैशाख अमावास्या**
*** नक्षत्र : भरणी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २२-४७ मेष**
**२२-४८ ते २४-०० वृषभ**



**रवी उदय- ०६-०५**
**रवी अस्त- १९-०५**

**दर्श भावुका अमावास्या, शनैश्चर जयंती, अमावास्या समाप्ती उत्तररात्री १.३१**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१ ई-मेलः contact@navakal.in

**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.

Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)





## काठियावाडी दही तिरवारी



★ **साहित्य :** १.५ कप घट्ट दही, ४ टीस्पून तेल, ८ पाकळ्या लसूण चिरलेली, १/२ टीस्पून जिरे, २ सुकी लाल मिरची, १/२ टीस्पून चिरलेले आले, १ छोटा कांदा चिरलेला, २ हिरवी मिरची चिरलेली, १/२ टीस्पून धने पावडर, एक चिमूटभर हिंग, १/२ चमचा काश्मिरी पावडर लाल मिरची पावडर, १/४ टीस्पून गरम मसाला, १ टीस्पून कसुरी मेथी, २ टीस्पून बेदाणे, १०-१२ कढीपत्त्याची पाने, चवीनुसार मीठ, १/२ चमचा हळद, बारीक चिरलेली कोथिंबीर सजवण्यासाठी.

★ **कृती :** सर्वप्रथम गॅस लावून घ्या. गॅस मध्यम ठेवून त्यावर एका जाड तळाच्या पॅनमध्ये तेल गरम करा आणि त्यात लसूण, जिरे, लाल मिरची आणि आले घाला. मिश्रणाचा वास येईपर्यंत तळा. कांदा आणि हिरवी मिरची घालून कांदा गोल्डन ब्राऊन होईपर्यंत परता. धनेपूड, हिंग, हळद, मीठ, काश्मिरी तिखट, गरम मसाला आणि कसुरी मेथी घालून मिक्स करा. सुगंध येईपर्यंत ढवळत असताना सर्व मसाले तळून घ्या. बेदाणे आणि कढीपत्ता घालून चांगले मिसळा. दही घालून परतावे. गॅस बंद करा. ताज्या कोथिंबिरीने सजवा आणि गरमागरम सर्व्ह करा. ही दही तिखारी भात, भाकरी किंवा चपाती बरोबर खाऊ शकता.




# गुजरात सलग सहावा विजय मिळवण्याच्या तयारीत
## ईडन गार्डनवर आज कोलकाता संघाशी भिडणार



**कोलकाताच्या ईडन गार्डनवर उद्या होणाऱ्या आयपीएलच्या ६० व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि गुजरात टायटन्स आमनेसामने येणार आहेत. गुजरातने याआधीच आयपीएलच्या प्लेऑफमध्ये जागा निश्चित केलेली आहे. या सामन्यात सलग सहावा विजय मिळवून गुजरात आयपीएलच्या गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचण्याचा प्रयत्न करणार आहे. कोलकाताचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर गेला आहे. मात्र पुढील तिन्ही सामने जिंकले तरी इतर सामन्यांच्या निकालावर कोलकाताचे भवितव्य अवलंबून आहे.**

■ कोलकाता

आयपीएलच्या या हंगामात गुजरातने आतापर्यंत १२ सामने खेळले आहेत. त्यात ८ सामन्यांत विजय मिळवला, तर ४ सामन्यांत पराभव पत्करावा लागल्यामुळे गुजरात १६ गुणांसह आयपीएलच्या गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहेत. कोलकाताने आतापर्यंत ११ सामन्यांत नशीब आजमावले आहे. त्यातील ४ सामन्यांत कोलकाताने विजय आणि ६ सामन्यांत पराभव झाला. एक सामना रद्द झाल्यामुळे कोलकाता ९ गुणांसह गुणतालिकेत आठव्या स्थानावर आहेत. गुजरात संघातील फलंदाजांच्या वरच्या फळीने आतापर्यंत संघाला एक भक्कम सुरुवात करून दिलेली आहे. यामुळे मधल्या आणि खालच्या फळीवरील दबाव कमी आला आहे.

सलामीवीर शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांची सलामीची जोडी मोठ्या धावसंख्येचा पाया रचत आहे. गेल्या वर्षी स्पर्धेत सर्वाधिक ७५९ धावा करणाऱ्या सुदर्शनने आतापर्यंत ५०१ धावा केल्या. तो सर्वाधिक धावा करणाऱ्या हैदराबादच्या हेनरिक क्लासेनपेक्षा फक्त सात धावांनी मागे आहे. त्याने आपल्या शेवटच्या सहा डावांमध्ये एका शतकासह पाच वेळा पन्नासपेक्षा जास्त धावा केल्या आहेत. कर्णधार गिलसुद्धा उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. बटलर आणि सुंदर यांनी मधल्या फळीत चांगली फलंदाजी केली आहे. कोलकाताचा संघाने या हंगामातील अतिशय खराब कामगिरी केली आहे. या संघाने पहिला विजय मिळवण्यासाठी सातव्या सामन्यांपर्यंत वाट पाहावी लागली. कर्णधार अजिंक्य राहणेला मोठी खेळी करण्यात अपयश आले आहे. रिकू सिंगने काही सामन्यांत संघासाठी चांगली कामगिरी केली आहे. इतर फलंदाजांना सातत्याने चांगली कामगिरी करता आली नाही.

## मल्लखांब योगदानाबद्दल देवल दाम्पत्याचा गौरव

■ मुंबई

**मल्लखांब** खेळात दिलेल्या मोठ्या योगदानासाठी बोरिवलीतील सर्वद फाउंडेशनतर्फे राष्ट्रीय मल्लखांबपटू आणि प्रशिक्षक आशिष,संचिता देवल दाम्पत्याचा राज्यस्तरीय सर्वद स्टार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ३८० अर्जांची छाननी करून ३० जणांची या पुरस्कारासाठी निवड केली. त्यामध्ये सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, पत्रकारिता या क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समावेश होता. कलाकार अरुण नलावडे, विद्यावाचस्पती डॉ. मिलिंद भोसुरे, संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान संस्थापक मोहन सालेकर या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना गौरवण्यात आले.

## फुटबॉल विश्वचषकासाठी फ्रान्सचा संघ जाहीर! एम्बाप्पेकडे कर्णधारपद

■ पॅरिस

११ जूनपासून सुरू होणाऱ्या फिफा फुटबॉल विश्वचषकासाठी आज फ्रान्सने २६ सदस्यीय संघाची घोषणा केली. २०२२ च्या कतार विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ३ गोल करणाऱ्या किलियन एम्बाप्पेला या संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले. प्रशिक्षक डिडिएर डेसचॅम्प्सने एक मजबूत फॉरवर्ड लाइन तयार केली. यामध्ये किलियन एम्बाप्पे याच्यासह उस्मान डेम्बेले आणि युवा स्टार डेसिरे डूए या खेळाडूंसारखी नावे आहेत. उपविजेता फ्रान्स तिसरा विश्वचषक जिंकण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

**फ्रान्सचा संघ - गोलकिपर :** माइक मेगनन, रॉबिन रिसर, ब्राइस सांबा.

**डिफेंडर :** लुकास डिग्ने, मालो गुस्टो, लुकास हर्नांडिझ, थियो हर्नांडिझ, इब्राहिमा कोनाटे, ज्युल्स कौंडे, मॅक्सेंस लॅक्रोइक्स, विल्यम सलिबा, डेयोट उपमेकानो.

**मिडफिल्डर :** एन'गोलो कान्ते, मनू कोने, एड्रियन रॅबियोट, औरेलियन टौआमेनी, वॉरेन झायर-एमरी.

**फॉरवर्ड :** मॅग्नेस अक्लिउचे, ब्रॅडली बार्कोला, रायन चेर्की, ओस्माने डेम्बेले, डेसिरे डौए, किलियन एम्बाप्पे, मायकल ओलिसे, जीन-फिलिप माटेता, मार्कस थुरम.

## महापौर कुस्ती स्पर्धा! प्रतिक, बालाजी व मुंतजीर उपांत्य फेरीत

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** कुस्तीपटू प्रतिक देशमुख, बालाजी मेटकरी, इम्रान मुजावर, मुंतजीर सरनोबत यांनी आपल्या उपांत्यपूर्व लढती सहज जिंकत मुंबई महापालिका आणि मुंबई शहर तालीम संघटना आयोजित ३२ व्या अखिल भारतीय मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेत आगेकूच कायम राखली.



उपांत्य फेरीत प्रतीकचा सामना इम्रानशी होईल. तर बालाजीसमोर मुंतजोरचे आव्हान असेल.

वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या क्रीडांगणात रंगलेल्या या स्पर्धेत ४ आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सहभागी झाले होते. पण कझाकिस्तानमध्ये २३ वर्षांखालील आशियाई कुस्ती स्पर्धेत रौप्यपदक मिळवणाऱ्या प्रतिक देशमुखचा अपवाद वगळता ओमकार काटकर, सनी फुलमाळी, दिनेश काकडे या आंतरराष्ट्रीय कुस्तीपटूंना प्राथमिक लढतीमध्ये पराभव पत्करावा लागला. विजेतेपदाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकताना प्रतिकने ठाण्याच्या विपुल परबला तांत्रिक चितपटीने १०-० असा मोठा विजय मिळवला. अन्य लढतीत सांगलीच्या इम्राननने सोलापूरच्या वैभव मानेला चितपट करत स्पर्धेतील आगेकूच कायम राखली. मुंतजीरने चितपट करत सोलापूरच्या सचिन काळेचे आव्हान संपुष्टात आणले. बालाजी मेटकरीने ५-३ अशा गुणांनी विनायक बजबळने विजय मिळवला. कुमार केसरी गटाच्या चुरशीच्या लढतीत विवेक पाटीलने हर्षवर्धन जाधवचा ५-४ असा एक गुणाने विजय मिळवला. ज्योतिधराज मुगदुमने सरस गुणांवर समर्थ बाऊलकरवर सहज विजय मिळवला. विराज कदमने त्रुतीराजा मुगदुमला ८-१ अशा गुणफरकाने हरवले.

## व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, कोल्हापूर, लातूर संघाची उपांत्य फेरीत धडक

■ बदलापूर

**क्रीडा** व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक व्हॉलीबॉल स्पर्धेत २ लढती जिंकून यजमान मुंबईसह कोल्हापूर आणि लातूर विभागाने उपांत्य फेरीत धडक मारली.

बदलापूर जिमखाना मैदानावर विद्युत प्रकाशझोतात रंगलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा दुसरा दिवस कोल्हापूर गाजविला. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूरने पहिला सेट गमावून २६-२८, २५-२१, १५-१२ गुणांनी मुंबईला हरवून मैदान गाजवले. या गटातील दुसऱ्या साखळी लढतीत लातूरने पुण्याची विजयी वाटचाल रोखत उपांत्य फेरीतील प्रवेशावर शिक्कामोर्तब केले. २१ वर्षांखालील मुलीच्या गटात मुंबईने पुणे संघावर २५-१९, २५-१९ गुणांनी मात करत उपांत्य फेरीत मजल मारली. याच गटात नागपूरने संभाजीनगरला २५-५, २५- ६ एकतर्फी पराभून करत स्पर्धेत आपले आव्हान कायम राखले आहे. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूर विरुध्द पहिला सेटवर मुंबईचे वर्चस्व गाजवले.

## राष्ट्रकुल व आशिया स्पर्धेसाठी बॉक्सर साक्षी चौधरीची निवड

■ नवी दिल्ली

**राष्ट्रीय** बॉक्सिंग निवड चाचणी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दोन वेळच्या विश्वविजेत्या बॉक्सर निखत झरीनचा पराभव केल्यामुळे साक्षी चौधरीची ग्लासगो राष्ट्रकुल आणि आशिया क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. त्यानंतर अंतिम सामन्यात साक्षीने विद्यमान विश्व आणि आशियाई चॅम्पियन मीनाक्षी हुडाचा पराभव केला. अंतिम सामन्यात पराभूत झालेल्या बॉक्सरची निवड १५ ते २० जून दरम्यान चीनमधील गुइयांग येथे होणाऱ्या जागतिक बॉक्सिंग चषकासाठी केली जाईल, तर विजयी बॉक्सरला दर ४ वर्षांनी होणाऱ्या या दोन्ही मोठ्या स्पर्धांसाठी कोटा मिळेल. यापूर्वी उपांत्य फेरीत साक्षीने शानदार कामगिरी करत दोन वेळची विश्वविजेती, राष्ट्रकुल क्रीडा सुवर्णपदक विजेती आणि आशियाई क्रीडा कांस्यपदक विजेती निखत झरीनला पराभूत करून सर्वांना आश्चर्यचकित केले.'



## बँक ऑफ इंडिया, मुंबई पोलीस आणि नेव्हल डॉक, महावितरणची विजय सलामी

■ मुंबई

**मुंबई** खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) स्पोर्ट्स क्लब आयोजित पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धा परळ येथील लाल मैदानावर शानदार वातावरणात सुरू झाली. आज झालेल्या सामन्यांत बँक ऑफ इंडिया, महावितरण कंपनी, नेव्हल डॉक आणि मुंबई पोलीस संघांनी विजयी सलामी दिली.

व्यावसायिक गटाच्या पहिल्या सामन्यात बँक ऑफ इंडियाने मुंबई महापालिकेचा १९-१७ (मध्यंतर १०-१०) असा चुरशीच्या लढतीत २ गुणांनी पराभव केला. मध्यंतराला सामना बरोबरीत सुटल्याने प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. मात्र अनुभवी प्रशिक्षक विवेक आंब्रे यांच्या रणनीतीमुळे बँकेने सामन्यावर पकड मजबूत केली. विजयी संघाकडून जनार्दन सावंत (१.३०, १.२० मि. संरक्षण व ५ गुण), मयुरेश मोरे (१.४०, १.२० मि. संरक्षण व १ गुण), अर्पित तिवारी (१, १.४० मि. संरक्षण व २ गुण) आणि मनोज चौधरी (१.२० मि. संरक्षण व ५ गुण) यांनी अप्रतिम खेळ करत विजय निश्चित केला तर पराभूत पालिकेकडून निखिल वाघे (१.२० मि. संरक्षण व २ गुण), आदित्य पाटील (१, १.१० मि. संरक्षण व १ गुण), अजय मित्रा आणि निमेश चौगुले (प्रत्येकी ३ गुण) यांनी जोरदार लढत दिली, मात्र ती अपुरी ठरली. दुसऱ्या सामन्यात महावितरणने गंदेकर इलेक्ट्रिकल्स प्रा. लि. वर १५-१४ (मध्यंतर १३-६) असा ७.१० मि. राखून रोमांचक विजय मिळवला. विजयी संघाकडून सम्यक जाधव (१.२० मि. संरक्षण व २ गुण), अनिकेत चेंदवणकर (१.४०, १.४० मि. संरक्षण व ४ गुण) व प्रतीक वाईकर (२ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली.

# लखनौ-कानपूर मार्गाचे उद्घाटन मोदी करणार

■ उन्नाव


**बहुप्रतिक्षित** लखनौ-कानपूर द्रुतगती मार्गाचे बांधकाम जवळपास पूर्ण झाले आहे. या मार्गाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी २४ मे रोजी उन्नाव येथे उद्घाटन करणार आहेत. या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातूनही मार्ग अत्याधुनिक बनवण्यात आला आहे. संपूर्ण मार्गावर अत्याधुनिक ३ डी कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

६३ किलोमीटर लांबीचा हा द्रुतगती मार्ग उत्तर प्रदेश राज्याची नवी ओळख बनणार आहे. बनी ते लखनौ दरम्यान बांधलेला १८ किलोमीटर लांबीचा उन्नत मार्ग हे त्याचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे. या मार्गामुळे लखनौ ते कानपूर प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल. पूर्वी या प्रवासाला दोन तास लागत होते, आता तो केवळ ४० ते ४५ मिनिटांत पूर्ण होईल. उन्नाव आणि आसपासच्या परिसरातील सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग आणि उद्योजकांना सुधारित कनेक्टिव्हिटीचा फायदा होईल. ज्यामुळे व्यापार आणि उद्योगाला चालना मिळेल.

# मणिपूरमध्ये हिंसाचार सुरूच
## बंडखोरांकडून ३८ जणांचे अपहरण

■ इंफाळ

**मणिपूरमध्ये** हिंसाचार सुरूच असून संशयित बंडखोरांच्या विविध गटांनी कुकी आणि नागा



जमातीतील ३८ जणांचे अपहरण करून त्यांना ओलीस ठेवले आहे, अशी माहिती मणिपूरचे गृहमंत्री गोविंदास कोनथाउजाम यांनी दिली. बुधवारी बंडखोरांनी कांगपोकपी जिल्ह्यात चर्चमधील तीन धर्मगुरुंची गोळ्या घालून हत्या केली, तर अन्य चार जण गोळीबारात जखमी झाले. नोनेय जिल्ह्यात एका व्यक्तिची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. त्या व्यक्तिची पत्नी गोळाबारात जखमी झाली आहे. गुरुवारी बंडखोरांच्या विविध गटांनी कुकी आणि नागा जमातीतील ३८ जणांचे अपहरण करून त्यांना ओलीस ठेवले आहे. त्यांची सुखरुप सुटका व्हावी यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, असे कोनथाउजाम यांनी सांगितले.

नोनेय जिल्ह्यात बंडखोरांच्या गोळीबारात मरण पावलेल्या एका व्यक्तिच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी कोनथाउजाम त्याच्या घरी गेले होते. त्यावेळी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

देश विदेश

# क्युबामध्ये डिझेल व पेट्रोल साठा संपला




■ हवाना

**अमेरिकेच्या** नाकेबंदीमुळे क्युबामध्ये डिझेल आणि पेट्रोलचा साठा पूर्णपणे संपला असून गॅसचा साठा मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. त्यासोबत क्युबाची वीज पुरवठ्याची स्थिती अतिशय गंभीर असल्याचे देशाचे ऊर्जा मंत्री व्हिसेंटे दे ला ओ लेव्ही यांनी म्हटले.

विसेंट डी ला ओ यांनी सांगितले की, राजधानी हवामोनामध्ये वीज कपातीचे प्रमाण प्रचंड वाढले असून अनेक भागांत दिवसातील २० ते २२ तास वीज नसते. राष्ट्रीय ग्रीड आता पूर्णपणे देशांतर्गत कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि सौर ऊर्जेवर चालत आहे. जो देश आम्हाला इंधन विकण्यास तयार असेल, क्युबा त्यांच्यासाठी खुला आहे. नाकेबंदी असूनही क्युबा इंधन आयातीसाठी बोलणी करत आहे. परंतु इराणसोबतच्या अमेरिका-इस्त्रायल तणावामुळे वाढत्या जागतिक कच्च्या तेलाच्या किमती आणि वाहतूक खर्च या प्रयत्नांमध्ये अडथळा ठरत आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

ट्रम्प यांच्या आदेशामुळे इंधन मिळेना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जानेवारी २०२६ मध्ये एक आदेश काढला होता. या आदेशानुसार क्युबाला इंधन पुरवठा करणाऱ्या कोणत्याही देशावर आयात शुल्क लावण्याची धमकी देण्यात आली होती. यामुळे एकेकाळी क्युबाचे प्रमुख कच्चे तेल पुरवठादार असणारे मेक्सिको किंवा व्हेनेझुएला देशांनी अद्याप इंधन पाठवलेले नाही.

# ब्रिटनचे आरोग्य मंत्री स्ट्रीटिंग यांचा राजीनामा

■ लंडन

**ब्रिटनचे** आरोग्य मंत्री वेस स्ट्रीटिंग यांनी तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला. ते पंतप्रधान कीर स्टारमर यांच्या नेतृत्वाला आव्हान देण्याची तयारी करत असल्याची चर्चा आहे. स्ट्रीटिंग हे मंत्रिमंडळ सोडणारे पहिले वरिष्ठ मंत्री ठरले. स्टारमर यांना पदावरून हटवण्याचा प्रयत्न करू शकणाऱ्या मोजक्या लोकांपैकी ते एक मानले जातात.

गेल्या आठवड्यात लेबर पार्टीला स्थानिक आणि प्रादेशिक निवडणुकांमध्ये अत्यंत निराशाजनक निकालांना सामोरे जावे लागले. तेव्हापासून स्टारमर यांच्यावर राजीनामा देण्यासाठी दबाव वाढत आहे. आपल्या राजीनामा पत्रात स्ट्रीटिंग यांनी लिहिले आहे की, स्टारमर यांनी जागतिक स्तरावर धैर्य दाखवले आहे आणि ब्रिटनला इराण युद्धापासून दूर ठेवले आहे, परंतु आता देशात आवश्यक असलेल्या दूरदृष्टी आणि दिशेचा अभाव आहे. स्टारमर पुढील सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाचे नेतृत्व करू शकणार नाहीत.

दरम्यान आणखी एक संभाव्य दावेदार आणि माजी उपपंतप्रधान अँजेला रेनर यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली. अँजेला रेनर म्हणाल्या की, स्टारमर यांनी आपल्या पदाचा विचार करावा. स्ट्रीटिंग यांनी आव्हान दिले, तर ते हे पद स्वीकारण्यास तयार असतील.

# लाटव्हियाच्या पंतप्रधान एव्हिका सिलिना पायउतार




■ रिगा

**लाटव्हियाच्या** पंतप्रधान एव्हिका सिलिना यांनी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. सत्ताधारी आघाडीतील महत्त्वाचा घटक पक्ष असलेल्या प्रोग्रेसिव्ह पार्टीने पाठिंबा काढून घेतल्यामुळे सिलिना सरकार अल्पमतात आले होते.

लाटव्हियाच्या हवाई हद्दीत काही युक्रेनियन ड्रोन भरकटत शिरले होते. या संवेदनशील परिस्थितीचा सामना करताना सरकार अपयशी ठरल्याचा आरोप प्रोग्रेसिव्ह पक्षाने केला होता. या वादानंतर संरक्षण मंत्री अँड्रिस स्प्रुड्स यांनाही राजीनामा द्यावा लागला होता. संरक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्यानंतरही सरकारमधील तणाव निवळला नाही. अखेर डाव्या विचारसरणीच्या प्रोग्रेसिव्ह पक्षाने सरकारला दिलेला पाठिंबा अधिकृतपणे काढून घेतला. ज्यामुळे पंतप्रधान सिलिना यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले.

# पाच खाण ब्लॉकचा लिलाव यशस्वी
## दरवर्षी २२० कोटींचा महसूल अपेक्षित



■ पणजी

**खाण** खात्याने सहा खाण ब्लॉकसाठी घेतलेल्या लिलाव प्रक्रियेत पाच ब्लॉकचा लिलाव यशस्वीरित्या पूर्ण झाला असून एक ब्लॉक तांत्रिक कारणांमुळे अपूर्ण राहिला आहे. आर्थिक बोली उघडल्यानंतर कुडणे (ब्लॉक १३) आनंदम कंपनीला, कुडणे (ब्लॉक १४) व्यंकटेश्वर राव कंपनीला, पिसुर्ले (ब्लॉक १५) जेएसडब्ल्यू कंपनीला, पिसुर्ले (ब्लॉक १६) आनंदम कंपनीला तर अडवलपाल (ब्लॉक १७) येथील ब्लॉक व्यंकटेश्वर राव कंपनीला मिळाला आहे. कावरे-पिर्ला (ब्लॉक १८) चा लिलाव मात्र तांत्रिक कारणांमुळे पूर्ण होऊ शकला नाही. या खाण ब्लॉकच्या लिलावामुळे सरकारला सुमारे २२० कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा आहे.

यापूर्वी १२ खाण ब्लॉकचा लिलाव पूर्ण झाला होता. नव्याने पाच ब्लॉकचा लिलाव पार पडल्याने एकूण १७ खाण ब्लॉकचा लिलाव पूर्ण झाला आहे. विशेष म्हणजे, यावेळीही सर्व ब्लॉक गोव्याबाहेरील कंपन्यांकडे गेले आहेत. उत्तर गोव्यातील पाच आणि दक्षिण गोव्यातील एक अशा एकूण सहा खाण ब्लॉकसाठी २८ जानेवारी रोजी निविदा काढण्यात आली होती.

# अमृता फडणवीस यांचे इंधनबचतीसाठी सायकलिंग

**मुंबई** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीचे आवाहन दिल्यानंतर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मलबार हिल परिसरात सायकल चालवली. त्यावेळी त्यांनी हेल्मेटदेखील घातले होते. त्यांचे अंगरक्षकदेखील सायकलवर त्यांच्या मागोमाग होते. काल देवेंद्र फडणवीस आपल्या वर्षा बंगल्यावरून बुलेट चालवत विधान भवनात पोहोचले होते. त्यावरून विरोधी नेत्यांनी जोरदार टीका केली होती. आज अमृता फडणवीस यांनी मुंबईतील रस्त्यावर सायकलिंग केले. त्यांच्या या सायकल प्रवासाचा व्हिडिओ सोशल मिडियावर पोस्ट होताच युजरनी उलटसुलट प्रतिक्रिया दिल्या. एका युजरने सांगितले की, याची गीनेस बुकमध्ये नोंद करा, तर दुसर्या युजरने म्हटले की, नाटक सुरू आहे.

# हांडेवाडीत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड! नागरिकांमध्ये संताप

■ पुणे

**पुण्यातील** हडपसर परिसरातील हांडेवाडी रस्त्यावर असलेल्या वनविज्ञान केंद्रात मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे. इनामदार वस्ती शेजारील या केंद्रात सुमारे ५०० ते ६०० झाडांची कत्तल करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

तोडण्यात आलेली झाडे सुमारे ४० ते ५० वर्षांपूर्वी लावलेली असून ती प्रामुख्याने 'ग्लेरिसिडिया' या जातीची आहेत. संबंधित अधिकाऱ्यांच्या मते, ही झाडे मूळतः जमीन सुपीक करण्यासाठी आणि पुढील लागवडीसाठी तयार करण्याच्या उद्देशाने लावण्यात आली होती. शेतीतील तागाच्या पिकाप्रमाणे काही वर्षांनी ही झाडे काढून टाकून त्यांच्या जागी देशी प्रजातींची लागवड करण्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी या वृक्षतोडीवर तीव्र आक्षेप घेतला आहे. पुण्यात सध्या वाढलेल्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर झाडे तोडणे पर्यावरणाच्या दृष्टीने घातक ठरू शकते, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

# भारतीय युवक मंद झाला
## राऊतांच्या पोस्टवरून आंदोलन

■ मुंबई

**उबाठा** खासदार संजय राऊत यांनी रशियन क्रांतिकारक व्लादिमीर लेनिन यांचा कोट आणि फोटो एक्सवर पोस्ट करत भारतीय युवक मंद झाल्याची टिप्पणी केली. यावरून भाजपा आणि शिंदे सेनेने आक्रमक भूमिका घेतली. शिंदे सेनेच्या युवा कार्यकर्त्यांनी राऊत यांच्या भांडूप निवासस्थानाबाहेर आज आंदोलन केले.

संजय राऊत यांनी एक्सवर लिहिले की, तुम्हाला एखादे राष्ट्र नष्ट करायचे असेल तर त्या देशातील युवकांची विचार करण्याची क्षमता नष्ट करा असे व्लादिमीर लेनिन म्हणायचे. (सध्या भारतीय युवक असाच भरकटलेला आणि मंद झाला आहे.) जय श्रीराम. त्यांच्या या पोस्टचा निषेध करत शिंदेसैनिकांनी संजय राऊत यांच्या निवासस्थानी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला.

# दुसऱ्या टप्प्यात ओबीसींची स्वतंत्र गणना होणार! छगन भुजबळांची माहिती

■ मुंबई

**राज्याचे** अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी जातीनिहाय जनगणनेचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती दिली आहे. देशभरात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेत ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेसह इतर महत्त्वाच्या मुद्द्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या टप्प्यात ओबीसींची स्वतंत्र गणना होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



छगन भुजबळ म्हणाले की, जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जनगणना केली जाईल, अशी भूमिका केंद्र सरकारने अधिकृत पत्राद्वारे स्पष्ट केली आहे. या निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील घर यादी प्रश्न क्रमांक १२ मध्ये सामाजिक वर्गीकरणासाठी केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर असे तीनच पर्याय देण्यात आले होते. त्यामध्ये इतर मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र रकान्याची तरतूद नसल्याने ओबीसी समाजाची विश्वासार्ह आणि अचूक जनगणना होणार नाही, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. यावर भुजबळ म्हणाले की, ही त्रुटी दूर करण्यासाठी जनगणनेच्या अर्जामध्ये ओबीसी या स्वतंत्र प्रवर्गाचा स्पष्ट समावेश करण्यात यावा, अशी मागणी मी ३० मार्च २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तसेच २७ मार्च २०२६ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्राद्वारे केली होती.

# एअर इंडिया इंजिनिअरिंग सर्व्हिसेस कर्मचाऱ्यांचे आंदोलन

■ नागपूर

**नागपुरातील** मिहान परिसरातील एअर इंडिया इंजिनिअरिंग सर्व्हिसेस येथे कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे विमानांच्या देखभाल व दुरुस्तीचे काम पूर्णपणे ठप्प झाले आहे. गेल्या तीन दिवसांपासून हे आंदोलन सुरू असून, कंपनीच्या धोरणांविरोधात कर्मचारी आक्रमक झाले आहेत. अपुऱ्या वेतनवाढीचा अभाव, महागाई भत्ता न मिळणे तसेच कामगार कायद्यांनुसार मिळणाऱ्या सुविधांचा अभाव या मुद्यांवरून कर्मचारी नाराज आहेत. या पार्श्वभूमीवर काही एअरक्राफ्ट तंत्रज्ञांनी राजीनामे दिले आहेत. मात्र, कंपनीकडून त्यांना कार्यमुक्त (रिलीव्ह) करण्यात येत नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. या धोरणाच्या निषेधार्थ त्यांनी आंदोलनाचा




**विमान देखभाल कामकाज ठप्प**

मार्ग स्वीकारला आहे. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, कंपनी वेतनवाढ करत नाही, महागाई भत्ता देत नाही आणि कामगार कायद्यांनुसार मिळणाऱ्या सुविधांपासूनही त्यांना वंचित ठेवले जात आहे. त्यामुळे अनेक कर्मचारी नाईलाजाने कंपनी सोडण्याचा निर्णय घेत आहेत. परंतु, राजीनामा दिल्यानंतरही त्यांना कार्यमुक्त केले जात नाही. कामगार आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना रिलिव्हिंग लेटर आणि अनुभव प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, त्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, असा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, आंदोलनात सहभागी झालेल्या काही कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकल्याचा आरोपही करण्यात आला आहे. एकीकडे कंपनी सोडू इच्छिणाऱ्यांना जाऊ दिले जात नाही, तर दुसरीकडे इतर कर्मचाऱ्यांशीही व्यवस्थापन मनमानी आणि हुकूमशाही पद्धतीने वागत असल्याचा आरोप आहे.

# नाशिक टीसीएस प्रकरणातील ५ आरोपींचा जामीन फेटाळला

**नाशिक** - नाशिकमधील टीसीएस कंपनीतील लैंगिक अत्याचार आणि धर्मांतर प्रकरणातील आरोपी एचआर अश्विनी चेनानीसह रजा मेनन, असिफ अन्सारी, शाहरुख कुरेशी आणि तौसीफ अत्तर या पाचही आरोपींचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे सर्व आरोपींना न्यायालयीन कोठडीतच राहावे लागणार आहे. या प्रकरणाची सुनावणी आज न्यायालयात झाली. आरोपींच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद करताना, आरोपींना अटक करण्याचे कोणतेही ठोस कारण नव्हते. त्यांनी तपासात सहकार्य केलेच असते आणि ते फरार होण्याची शक्यताही नव्हती, असा दावा केला.

# विधी विद्यार्थ्यांसाठी समर इंटर्नशिप प्रोग्राम

■ मुंबई

**कायदे** क्षेत्रातील प्रसिद्ध संस्था 'दर्द से हमदर्द तक ट्रस्ट', 'जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मुंबई' आणि 'सुप्रा लीगल फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने विधी विद्यार्थ्यांसाठी 'समर इंटर्नशिप प्रोग्राम'चे आयोजन करण्यात आले आहे. चर्चगेट येथील 'बहाई सेंटर' (पहिला मजला, कोर्ट चेंबर) येथे शनिवारी सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव पवनकुमार तपडिया यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

इंटर्नशिपची संकल्पना 'बियॉन्ड द टेक्स्टबुक: इंटर्नशिप एक्सपिरियन्स इन क्रिमिनल लॉ अँड लीगल एड' अशी ठेवली आहे. अॅड. सुनिता साळसिंगीकर, अॅड. आशि नारायण आणि अॅड. प्रकाश साळसिंगीकर यांच्या पुढाकाराने हा उपक्रम आयोजित केला आहे. इंटर्नशिप कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या उपक्रमात सुमारे ६५ ते ७० विद्यार्थ्यांची निवड केली आहे. विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान व व्यावहारिक अनुभव मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या इंटर्नशिप कार्यक्रमामध्ये विविध न्यायालयांना भेटी, वकिलांच्या कार्यालयांना भेट, राजगृह भेट, अनुसूचित जाती-जमाती आयोग तसेच मानवाधिकार आयोगाला भेट अशा विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

# हडपसर रुग्णालयाबाहेरील बॉम्ब बनावट असल्याचे तपासात उघड

■ नागपूर

**पुण्यातील** हडपसर परिसरातील खासगी रुग्णालयाबाहेर बॉम्बसदृश वस्तू ठेवल्यामुळे खळबळ उडाली होती. याप्रकरणी एटीएसने आरोपी शिवाजी राठोडला ताब्यात घेतले. त्याला वर्धा जिल्ह्यातील पुलगाव रेल्वे स्थानक येथे पकडण्यात आले. पण पोलिसांनी हा बॉम्ब बनावट असल्याचे सांगितले.

पोलिसांना आरोपी शालीमार एक्स्प्रेसने नागपूरकडे जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पुणे एटीएस, नागपूर एटीएस आणि रेल्वे सुरक्षा बलाने संयुक्त कारवाई करत सापळा रचला. रेल्वे स्थानकावरून आरोपीला ताब्यात घेतले. तपासादरम्यान आरोपीने हडपसर येथील रुग्णालयात ठेवलेल्या बॉम्बसाठी लागणारे काही कच्चे साहित्य घेतल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे एटीएस त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून होती.पोलिसांनी सांगितले की, रुग्णालयातील वस्तू प्रत्यक्षात बॉम्ब नव्हती. उपचारासाठी पैसे नसल्याने डॉक्टरकडून खंडणी उकळण्यासाठी बॉम्बसदृश वस्तू तयार केली होती. आरोपी शिवाजी राठोडला उपचारासाठी ७ लाख रुपयांचा खर्च सांगितला होता. त्यानंतर त्याने युट्युबच्या मदतीने वायर आणि डिजिटल घड्याळाच्या सहाय्याने बनावट बॉम्ब तयार केला होता. उषाकिरण रुग्णालयाच्या परिसरात संशयास्पद बॉम्बसदृश वस्तू आढळल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.


## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११०१८.

**स्थापत्य विभाग**

**ई निविदा सुचना क्र- स्थापत्य/ब, क मुख्यालय/१/६/२०२६-२७**

पिंपरी चिंचवड महानगरपालिके कडून खालील नमुद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.
१. निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतुन मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा.
२. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३. रॉयल्टी बाबत मनपा जे धोरण ठरवेल ते आपणांवर बंधनकारक राहील.

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (४+६) | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टी ची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महीने) | निविदा फॉर्म फी जी.एस.टी. सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | स्थापत्य ब मुख्यालय | | | | | | | | |
| १ | पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे आटोमेटेड सर्व्हेक्षणानुसार क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २२ काळेवाडी मधील रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे. | ६५५१८७३ | ६४७६२९८ | १०७५५ | ७५५७५ | ६५५१९ | ३२७६०० | १२ | ३१४७ |
| २ | पिंपरी चिंचवड शहरातील रस्त्यांचे आटोमेटेड सर्व्हेक्षणानुसार क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १८ चिंचवड मधील रस्त्यांची दुरुस्तीची कामे करणे. | ६५५०८९१ | ६४७५३१६ | ३०९२७ | ७५५७५ | ६५५०९ | ३२७५५० | १२ | ३१४७ |
| ३ | सन २०२४-२५ करीता प्रभाग क्र. १८ मधील तालेरा रुग्णालयाची स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणे. | ११८४८४६२ | ११८१९२५२ | २६३२८ | २९२१० | ११८४८५ | ५९२४३० | १८ | ४६३७ |
| | स्थापत्य क मुख्यालय | | | | | | | | |
| ४ | प्रभाग क्र. ९ महापालिकेच्या इमारती व मिळकतींची स्थापत्य व फर्निचर विषयक कामे व अद्ययावत पध्दतीने सुशोभिकरण करणे व विविध तातडीची इमारतींची अत्यावश्यक कामे करणे. | ३५७५१०४ | ३५३८५६९ | २४६३६ | ३६५३५ | ३५७५१ | १७८७६० | १२ | २३९७ |
| ५ | प्रभाग क्र. ९ मधील शाळा इमारत, रुग्णालय इमारत व इतर मनपा इमारतींचे देखभाल व किरकोळ दुरुस्ती करणे. | ३८८३१३९ | ३८४६६०४ | १६६९२ | ३६५३५ | ३८८३१ | १९४१६० | १२ | २३९७ |
| ६ | प्रभाग क्र. ८ सेक्टर नं. १,२,३,४,६ व इतर ठिकाणी ऑटोमेटेड सर्वेक्षणानुसार रस्त्यांची दुरुस्ती करणे व डांबरीकरण करणे (सन २०२५-२६) | ७४६८४०६ | ७३८४१७६ | २९९९२ | ८४२३० | ७४६८४ | ३७३४३० | १२ | ३१४७ |


| निविदेचे वेळापत्रक | | |
|---|---|---|
| ई निविदा उपलब्ध कालावधी | :- | दि. १८/०५/२०२६ ते दि.२५/०५/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | :- | दि.२५/०५/२०२६ दुपारी ०३.०० वा.पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | :- | दि.२८/०५/२०२६ दुपारी ३.०० वाजता शक्य झालेस |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णतः किंवा अंशतः मंजुर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वतःकड़े राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१.www.pcmcindia.gov.in २.https://mahatenders.gov.in
सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-epro@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462,0120-4001002,0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
शहर अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - ४११०१८.

जाहिरात क्रमांक -जा.क्र.स्था/१५/कावि/१८६/२०२६
दिनांक १५-०५-२०२६
जाहिरात क्र.: २०२६-२७/४५

## नवाकाळ शब्दकोडे–१६०७



**आडवे शब्द –**

१. आमूलाग्र परिवर्तन, मोठा बदल ५. इनामी जमीन, वतन ८. अनुचित पद्धतीने केलेला उपयोग ११. धान्य पाखडण्याचे साधन १२. सोंगट्यांच्या खेळाचा मांडलेला डाव १३. मिठी १५. वाईट सवय १७. जवळ, निकट १९. समुद्राच्या पोटातील अग्नी २१. राजाप्रमाणे थाटात २२. सैनिक २३. प्रचंड २४. सरहद्द २५. नेत्र २६. निर्णय २८. गाढव ३०. कुबेराचा सेवक ३१. गाणे ३३. पायात पादत्राणे नसलेला ३५. पावसाचा देव ३७. एकाएकी ४०. यकृत, अंतःकरण ४२. पोपट ४३. विचार, बेत ४४. पडदा ४५. सूड ४६. स्थूल ४७. कुठल्याही कारणाशिवाय, निरुद्देश ४९. उपयोगात आणणे ५१. नाविक ५३. नाटकातील सुरुवातीचे मंगलाचरण ५६. दाणेदार तूपाचे वर्णन ५७. इंद्राची पत्नी ५८. माज, मस्ती ५९. ऐट ६१. कलंकित, भ्रष्ट ६२. राज्यसुख ६४. हां हां म्हणता, बघता बघता ६६. माधवराव पेशवे यांच्या पत्नीचे नाव ६९. वर्ग, दालन ७०. खाट ७१. तान ७२अ. आकाश ७२. ग्रामदेवता ७३. सारखा ७५. प्रधान ७६. निशा ७७. पावन ७८. आळसावलेला ७९. ढीग ८०. गजऱ्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सुवासिक फुलांचे दोन प्रकार ८३. रानात पसरलेली आग ८४. कुबेराची राजधानी ८६. बोभाटा, गवगवा ८८. श्वसनासाठी आवश्यक ९०. चांगला, सभ्य ९१. घरातल्या किरकोळ वस्तू ९३. समय ९५. प्राण ९७. यज्ञोपवीत ९८. उत्तम शिजलेले, मृदू १००. बैठा सत्याग्रह १०२. पहाड १०३. यज्ञ १०४. गर्दी १०५. पंढरपूरचा परंपरागत पुजारी

**उभे शब्द –**

१. पोट भरणे, उदरनिर्वाह २. असत्य, खोटे वचन ३. कसब ४. शीण ६. त्रास ७. गदिमांनी रचलेले रामकथेवरील लोकप्रिय काव्य ९. देवांची घोडागाडी १०. अनुमती ११. मुलाची बायको १४. द्युतात हरल्यामुळे पांडवांना झालेली शिक्षा १६. निर्धास्तपणे १८. भयंकर २०. अर्धचंद्र, हकालपट्टी २२. सरशी २५. नूतन, कोरे २६. मख्ख २७. सीता २८. राजाची बायको २९. घर, वास्तू ३२. अतिशय संतप्त होणे याअर्थी वाक्प्रयोग ३४. उत्तराधिकार, परंपरेने मिळालेला ३६. नाराजी ३७. शर्त ३८. गती, प्रेरणा ३९. कपर्दिक ४१. घाई ४३. उन्मत्तपणा ४४. सरकारी परवानगी ४८. हेकट ५०. पंख ५२. दारू ५३. 'काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल...' (संत एकनाथ) ५४. दुसरा ५५. वास्तूच्या आतील भागाचे मोजमाप ५८. राजवाड्यातील दालन ५९. अल्प ६०. पाहुणचार ६१. वडिलांचे संबोधन ६२. स्त्रीच्या अथवा तिच्या पालकांच्या इच्छेविरुद्ध केलेले लग्न ६३. डोईचे सर्व केस काढणे ६५. हरणे-जिंकणे ६७. चोप ६८. ललाट ७४. केवळ ७६. मोहरी ७७. प्रतिज्ञा ७८. सोपे, सुकर ८१. पुरातन ८२. मेंदू ८३. उणे, कमी ८५. लालूच ८६. विहीर तळाचा चिखल ८७. पांथस्थ ८९. घोडा ९२. भांडकुदळ स्त्री ९३. कर्नाटक आणि तामिळनाडूमधून जाणारी एक नदी ९४. भाग्य ९६. दुष्टाचा निःपात ९९. शेवट, निकाल १०१. नोकरीत घेतलेली सुट्टी

•

**नवाकाळ कोडे क्रमांक १६०६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. कपाळ ३. साबरमती ७. साधुवाणी १०. नीरव १३. रगड १५. रान १६. भाट १७. जाणीवपूर्वक १९. केकावली २२. वासरू २४. कात २५. नट २६. तथा २८. पती ३०. रडवेला ३२. रूढ ३४. राघू ३७. नग ४०. शेंडेफळ ४१. सभासद ४३. चूर ४४. जादू ४५. लाखो ४६. नगरसेवक ४८. इमारत ५१. मुख ५२. मासा ५४. खाज ५६. मेख ५७. शेतकरी ५९. अढी ६०. इमानदार ६३. सावज ६५. बाजा ६६. सैल ६७. सलामत ६८. हजरजवाबी ७१. गल्ली ७३. वणी ७४. सहचर ७५. तीर ७६. जलद ७८. बोलावणे ८१. कद ८३. बस ८६. कनात ८८. सुतराम ८९. नजरबंदी ९२. डाक ९४. खर ९५. साकेत १००. अथवा १०२. पाळीव १०४. अकस्मात तोही पुढे जात आहे १०६. सफर १०७. जल १०८. गवा १०९. वखार ११०. खमण

**उभे शब्द :** २. पाहणी ४. बरकत ५. रग ६. मडके ८. धुरा ९. वानवा १०. नीट ११. वसंत १२. शेपूट १४. भव १६. भारूड १७. जागरूक १८. वन २०. कान्हा २१. लीप २३. सर २४. काला २७. थारा २९. तीन ३१. वेस ३३. गोफण ३५. घुसखोर ३६. हसतमुख ३८. गर्भगळित ३९. क्षर ४०. शेंदूर ४२. मासेमारी ४३. चूक ४४. जामानिमा ४७. वसा ४९. तगादा लावणे ५०. सखा ५३. कढी ५५. जसा ५६. मेज ५७. शेजारती ५८. कडवा ५९. अलगद ६०. इष्ट ६१. नस ६२. रमणी ६४. वसाहत ६५. बाज ६८. हरकत ६९. जरब ७०. बीज ७२. हेला ७७. लहर ७८. बोबडा ७९. वन्य ८०. मैना ८२. दरारा ८४. सन ८५. चांदी ८६. कर ८७. तसा ८८. सुत ९०. जप ९१. बंडाळी ९३. कलकल ९४. खडतर ९६. केवढे ९७. संथ ९८. शाहीर ९९. फतवा १००. अहेव १०१. वासर १०२. पारख १०३. वळण १०४. अज १०५. जाग

## तिघी मुलींचा स्वयंपाक कोण करणार ?

पान १ वरून

ओढले. त्यानंतर बस चालक उमेश आणि वाहक रामेंद्र यांनी धावत्या बसमध्ये जवळपास दोन तास तिच्यावर आळीपाळीने लैंगिक अत्याचार केला. बस दिल्लीच्या विविध भागांतून नांगलोईच्या दिशेने फिरत होती. ही बस बिहारमध्ये नोंदणीकृत स्लीपर बस होती आणि तिच्या खिडक्यांना पडदे लावलेले होते. त्यामुळे बाहेरून आत काय सुरू आहे हे दिसत नव्हते. अत्याचारानंतर आरोपींनी महिलेला नांगलोई मेट्रो स्थानकाजवळ सोडून दिले. गंभीर अवस्थेत असलेल्या महिलेने पोलिसांशी संपर्क साधला. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि तिला वैद्यकीय तपासणीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तिच्या जखमांचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ रुग्णालयात भरती होण्याचा सल्ला दिला. मात्र, महिलेने रुग्णालयात राहण्यास नकार दिला. तिने पोलिसांना सांगितले की, तिचा पती क्षयरोगाने आजारी असल्याने घरातच असतो. त्यामुळे तिला काम करणे गरजेचे आहे. शिवाय तिला ८, ६ आणि ४ वर्षांच्या तीन मुली आहेत. मी रुग्णालयात राहिले तर मुलांसाठी स्वयंपाक कोण करणार? नवऱ्याची काळजी कोण घेणार? असा सवाल विचारत त्या गंभीर अवस्थेतही तिने भरती होण्यास नकार दिला. महिलांच्या सुरक्षेबरोबरच आर्थिक आणि सामाजिक असुरक्षिततेचाही प्रश्न या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या घटनेमुळे २०१२ मधील निर्भया प्रकरणाच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या. त्यावेळी दिल्लीत एका पॅरामेडिकल विद्यार्थिनीवर धावत्या बसमध्ये सामूहिक बलात्कार करून अमानुष मारहाण करण्यात आली होती. त्या घटनेनंतर देशभरात आंदोलनांची लाट उसळली होती.

## गेटवे-मांडवा जलवाहतूक सेवा २६ मेपासून बंद

■ अलिबाग



**पावसाळी** हंगामात समुद्रातील वाढता धोका लक्षात घेऊन गेटवे ऑफ इंडिया ते मांडवा या मार्गावरील प्रवासी जलवाहतूक सेवा २६ मे पासून ३१ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मांडवा विभागाच्या बंदर निरीक्षकांनी यासंदर्भात अधिकृत निर्देश जारी केले आहेत. पावसाळ्यात समुद्र खवळणे, वाऱ्याचा वेग वाढणे व वादळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळा सुरू होण्यापूर्वीच ही जलवाहतूक बंद करण्यात येणार आहे. गेटवे ते मांडवा दरम्यान पीएनपी, मालदार आणि अजंठा या कंपन्यांच्या बोटींद्वारे प्रवासी वाहतूक केली जाते. या आदेशानंतर या सर्व सेवा निर्धारित कालावधीत पूर्णपणे बंद राहतील. मुंबई-अलिबाग दरम्यान जलमार्ग हा जलद आणि किफायतशीर पर्याय मानला जातो. कमी वेळात प्रवास पूर्ण होत असल्याने अनेक प्रवासी या मार्गाला प्राधान्य देतात. मात्र, या सेवेला ब्रेक लागल्याने प्रवाशांना आता रस्तेमार्गाचा पर्याय निवडावा लागणार आहे. दरम्यान, भाऊचा धक्का ते रेवस या मार्गावरील प्रवासी व दुचाकी वाहतूक करणारी जलसेवाही पावसाळ्यात बंद राहणार आहे.

## मुंबईतील बाईक-टॅक्सी चालकांच्या प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांना खुले पत्र

■ मुंबई

**महाराष्ट्र** बाईक टॅक्सी वेल्फेअर असोसिएशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खुले पत्र लिहिले आहे. यात परिवहन विभागाच्या अलीकडील निर्देशानंतर राज्यातील लाखो बाईक-टॅक्सी चालकांच्या उपजीविकेसाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, एप्रिल २०२५ मध्ये शासनाने बाईक-टॅक्सी सेवेला मान्यता दिली होती. मात्र, अलीकडील निर्बंधांमुळे नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, ठाणे आणि सोलापूरमधील लाखो चालकांचे उत्पन्न ठप्प झाले आहे. नवीन इलेक्ट्रिक दुचाकी खरेदी करण्यासाठी १.२ लाख ते १.८ लाख रुपयांपर्यंत खर्च येत असल्याने सर्वसामान्य चालकांना हा खर्च परवडणारा नसल्याचे संघटनेने पत्रात नमूद केले आहे.

महाराष्ट्र बाईक टॅक्सी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष अमित गावडे यांनी शासनाकडे २४ ते ३६ महिन्यांची ई-व्ही संक्रमण योजना लागू करावी, अनुदानित कर्ज उपलब्ध करून द्यावे आणि वैयक्तिक चालकांसाठी स्वतंत्र धोरण आखावे, अशी मागणी केली आहे.

## आता वांद्रे-गोरखपूर विशेष ट्रेन

पान १ वरून

बयाना, भरतपूर, मथुरा, हाथरस सिटी, कासगंज, बरेली सिटी, इज्जतनगर, पिलीभीत, मैलानी, सीतापूर, बुरहवाल, गोंडा, बस्ती आणि खलीलाबाद स्थानकांवर थांबा घेणार आहे.

दरम्यान यापूर्वी दादर-रत्नागिरी पॅसेंजर रेल्वे बंद करून त्याऐवजी दादर-गोरखपूर रेल्वे कायमस्वरूपी सुरू करण्याचा निर्णय घेतल्याने मध्य रेल्वेवर दुजाभावाचा आरोप झाला होता. कोकण आणि महाराष्ट्रातील प्रवाशांच्या सेवांमध्ये कपात करून उत्तर भारतातील प्रवाशांसाठी विशेष गाड्यांचे नियोजन केले जात असल्याचा आरोप प्रवासी संघटना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी केला होता. या विरोधानंतरही परप्रांतीय प्रवाशांसाठी वारंवार विशेष गाड्या सोडल्या जात असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी अतिरिक्त गाड्या, वाढीव फेऱ्या आणि नियमित सेवा सुरू करण्याची मागणी आता पुन्हा जोर धरू लागली आहे.

## माण-खटावमध्ये शेतकऱ्यांचा पाण्यासाठी आक्रोश मोर्चा

**म्हसवड** - माण-खटाव तालुक्यातील पाणीटंचाई, पाणी वाटपातील असमतोल आणि पाणी चोरीच्या मुद्द्यांवर म्हसवड येथे शेतकऱ्यांनी मोर्चा काढला. उष्णतेची तीव्र लाट असतानाही शेकडो शेतकरी आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. सिद्धनाथ रथगृहापासून निघालेला मोर्चा विविध मार्गांवरून जात अप्पर तहसीलदार कार्यालयावर पोहोचला. यावेळी अप्पर तहसीलदार मीना बाबर यांना निवेदन देण्यात आले.

## आयात शुल्कवाढीनंतर सोने आयातीवरही निर्बंध

पान १ वरून - भिडले आहेत. कच्च्या तेलासाठी भारत आयातीवरच अवलंबून आहे. कच्च्या तेलाचे भाव वाढल्याने भारताला तेलाच्या आयातीवर जास्त परकीय चलन खर्च करावे लागत आहे. त्यामुळे परकीय चलनाची बचत करण्यासाठी सरकारने सोने आयातीवर निर्बंध लागू केले आहेत. त्यानुसार परवानाधारक सोने आयातदारांना एकावेळी कमाल १०० किलो सोने आयात करता येणार आहे. याआधी सरकारने सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्क्यांपर्यंत वाढवले आहे.

यासंदर्भात ऑल इंडिया जेम्स अँड ज्वेलरी असोसिएशनचे अध्यक्ष राजेश रोकडे यांनी सांगितले की, परकीय चलनाची बचत करण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला असला तरी त्याने देशाच्या अर्थव्यवस्थेचे फार मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सोन्याच्या निर्यातीवर निर्बंध घातले गेल्याने चोरट्या मार्गाने सोन्याची आयात करणाऱ्या तस्करांना वाव मिळणार आहे. प्रामाणिकपणे सोने आयात करून व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांवर त्यामुळे अन्याय होत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कायदेशीर मार्गाने बिल घेऊन सोने खरेदी करायचे असेल तर सध्या एक किलो सोन्याचा १ कोटी ६३ लाख रुपये भाव आहे. मात्र तेच सोने बेकायदेशीरपणे म्हणजेच बिलाशिवाय घ्यायचे असेल तर त्याची किंमत प्रति किलो १ कोटी ५५ लाख रुपये आहे. याचा अर्थ प्रामाणिकपणे सोने आयात करणाऱ्या व्यापाऱ्यापेक्षा बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्यांना सोने प्रति किलो ८ लाख रुपये स्वस्त मिळते. सोन्याच्या आयातीवर निर्बंध घातले गेल्याने अशा प्रकारच्या तस्करीला अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन दिले जाणार आहे.

## मुंबईत आंबा-काजू उत्पादकांचा मोर्चा

पान १ वरून

शाब्दिक वाद झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. काही ठिकाणी धक्काबुक्कीही झाली. गिरगाव चौपाटी परिसरात राजू शेट्टी, महादेव जानकर, हर्षवर्धन सपकाळ आणि दीपक पवार यांच्यासह अनेक आंदोलकांची धरपकड करून त्यांना डोंगरी पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तर विनायक राऊत यांच्यासह काही नेत्यांना आझाद मैदान येथे नेण्यात आले. दरम्यान काही आंदोलकांनी मंत्रालय परिसरात जाऊन तिथे आंबेफेक केली. या आंदोलनात उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, जनता दल, कम्युनिस्ट पक्ष सहभागी झाले होते.

राजू शेट्टी यांनी सरकारला जनरल डायर संबोधत सरकारवर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, गेल्या दोन महिन्यांपासून कोकणातील शेतकरी रस्त्यावर उतरून न्याय मागत आहेत. मुख्यमंत्री अनेकदा कोकण दौऱ्यावर आले. पण त्यांनी शेतकऱ्यांच्या भावना समजून घेतल्या नाहीत. त्यांना साधे निवेदन स्वीकारायलाही वेळ दिला नाही. कोकणातील शेतकरी पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने मुंबईत आला होता. मात्र त्यांच्या वेदनांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर पोलीस कारवाई केली.

**THE MUNICIPAL CO-OPERATIVE BANK LTD., MUMBAI**
Municipal Bank Bhavan, 245,
P. D' Mello Road, Fort, Mumbai –400 001
**TEL:** +91-22-2271 7800/879
**EMAIL:** mcbank@mcbmumbai.com/ estate@mcb.bank.in

**TENDER NOTICE**

The Municipal Co-Op. Bank Ltd., Mumbai has invites sealed tenders for **"Tender Document for Comprehensive Annual Maintenance Contract for Pest Control services for Branches & ATM'S"**

Tender documents shall be downloaded from the bank's website: www.mcb.bank.in from 16/05/2026. Last date and time for submission of Tender : On or Before 25/05/2026 up to 5.00 PM

**Place: Mumbai** **Sd/-**
**Date: 15/05/2026** **General Manager**

## सीएनजी मागोमाग पेट्रोल-डिझेलची ३ रुपये दरवाढ

पान १ वरून

पेट्रोलियम उत्पादनांचा वापर केवळ गरजेनुसार केला तर केवळ परकीय चलनच वाचणार नाही, तर युद्धाचे प्रतिकूल परिणामही कमी होतील, असे पंतप्रधानांनी म्हटले होते. इंधनबचतीसाठी घरून काम करणे, मेट्रोने प्रवास आणि कारमधून एकत्र प्रवास करण्याचा सल्ला दिला होता.

पेट्रोल - डिझेल दरवाढीच्या घोषणेनंतर काँग्रेसने एक व्हिडिओ पोस्ट करून सरकारवर टीका केली. या व्हिडिओत म्हटले की, केंद्र सरकारने निवडणुका संपताच जनतेवर दरवाढीचा बोजा टाकला. नेपाळने पेट्रोलचे दर २ रुपये, तर डिझेलचे दर १२ रुपयांनी कमी केले. ऑस्ट्रेलियाने उत्पादन शुल्क कमी करून पेट्रोल १७ ने स्वस्त केले. जर्मनीने तेलावरील कर कमी करून पेट्रोल आणि डिझेलचे दर १७ ने कमी करून १९ वर आणले. ब्रिटनने वीज बिलावर १०० पौंडची सूट दिली. जनतेला होणारा त्रास टाळण्यासाठी त्यांनी तेलावरील कर कमी केले. मात्र मोदी सरकारने काय केले? व्यावसायिक एलपीजीचे छोटे सिलिंडर २६१ रुपयांनी, तर दूध २ रुपये प्रति लिटरने महाग केले. सोने आणि चांदीवरील आयात शुल्क १५ टक्क्यांनी वाढवले. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी स्वतंत्र पोस्ट करून म्हटले की, मोदी सरकारच्या चुकीची किंमत जनतेला मोजावी लागेल. ३ रुपयांचा फटका आधीच बसला आहे, उर्वरित वसुली हप्त्यांमध्ये केली जाईल. मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले की, देशभरात पेट्रोल-डिझेल महागले आहे. अमेरिकेत ही वाढ ५१ टक्के आहे. मोदींनी फक्त ३ रूपये वाढवले.

## नीट परीक्षा २१ जून रोजी

पान १ वरून - या परीक्षेसाठी राधाकृष्ण समितीने सुचविलेल्या सर्व नियमांचे पालन करून देखिल ३ मे च्या परीक्षेत माफियांनी व्यत्यय आणला. कुठे तरी सरकारच्या व्यवस्थेत त्रुटी राहिल्या. ही जबाबदारी पूर्णपणे सरकारची होती आणि ती सरकारने स्वीकारली आहे. पुढच्या वर्षीची परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे, असे प्रधान यांनी सांगितले. ३ मे रोजी घेतलेल्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी भरलेले शुल्क (फी) पूर्णपणे परत करण्याची जबाबदारी एनटीएने घेतली असून, २१ जून रोजी होणारी परीक्षा पूर्णपणे निःशुल्क असेल. १४ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना त्यांची प्रवेश पत्रे घरपोच केली जातील. तसेच यावेळी विद्यार्थ्यांना आपल्या पसंतीचे शहर निवडायची सुविधाही सरकारने उपलब्ध करून दिली आहे. म्हणजे कोणत्या शहरात परीक्षा द्यायचे हे विद्यार्थी स्वतःच्या सोयीनुसार ठरवू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवस्था करण्याबाबतही सरकार चाचपणी करत आहे, असे प्रधान यांनी पुढे सांगितले.

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**ई-निविदा आमंत्रण सूचना**

प्रधान मुख्य अभियंता, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि., आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा द्वारे सिंगल बिड प्रणाली अंतर्गत पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी खुली निविदा मागवित आहेत.

**अनु क्र. 1, कामाचे नाव:** कर्नाटक राज्यातील कारवार विभागाच्या वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता यांच्या अखत्यारीतील एसईएन/उडुपी सेक्शनमध्ये एसएसई उडुपी अंतर्गत उडुपी (समाविष्ट) ते सेनापुरा (वगळून) स्थानकांदरम्यान ओळखण्यात आलेल्या विभागांमध्ये 52 किग्रॅ, 260 मीटर रेल पॅनल्सद्वारे 35 कि.मी. लांबीचे (टीकेएम) रेल नूतनीकरण करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2026-07. अंदाजित किंमत:** रु. 2,93,66,686/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 05.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** चार महिने मान्सून सह.

**अनु क्र. 2, कामाचे नाव:** कर्नाटक राज्यातील कारवार विभागाच्या वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता यांच्या अखत्यारीतील एसईएन /उडुपी सेक्शनमध्ये एसएसई भटकल अंतर्गत शिरूर (समाविष्ट) ते कुन्दापुरा (वगळून) स्थानकांदरम्यान ओळखण्यात आलेल्या विभागांमध्ये 52 किग्रॅ, 260 मीटर रेल पॅनल्सद्वारे 35 कि.मी. लांबीचे (टीकेएम) रेल नूतनीकरण करणे. **निविदा सूचना क्र.: केआर-डब्ल्यू-1-58-2026-06. अंदाजित किंमत:** रु. 2,93,66,686/- जीएसटी वगळून. **बंद होण्याची दिनांक/वेळ:** 05.06.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाइन ऑफर/बोली सादर करण्यासाठी. **पूर्णत्व कालावधी:** चार महिने मान्सून सह.

मॅन्युअल ऑफर स्वीकारल्या जाणार नाहीत. तपशील/सहभागासाठी कृपया https://ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. दुरुस्तीपत्रक/परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**जाहीर सूचना**

**सौ. व्हेरोनिका जोसेफ,** या वास्तुलाभ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या सदस्या असून, भाग प्रमाणपत्र क्र.९ मधील प्रत्येकी रु.५०/- किंमतीचे पूर्ण भरणा केलेले १० शेअर्स एकूण रु. ५००/- ज्यांचे विशिष्ट क्र.८१ ते ९० (दोन्ही समाविष्ट) आहेत, त्यामधील ५०% हिस्सा, हक्क, शिर्षक, हितसंबंध व लाभ तसेच सोसायटीच्या इमारतीतील २ऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.२०३ मधील ५०% अविभाजित हिस्सा त्यांच्या मालकीचा होता, त्यांचे दिनांक २७.०९.२०१० रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले.

सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी सायं.५.०० ते ८.०० वा. दरम्यान उपलब्ध आहेत. सर्व दावे सोसायटीच्या सचिवांकडे, वास्तुलाभ कोहौसोलि, राजमाता जिजाबाई रोड, पंप हाऊस, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३ येथे सादर करावेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १६.०५.२०२६

सही/-
**(श्री.दिपेश जे. सांचला)**
वकिल

**जाहीर सूचना**

**सौ.व्हेरोनिका जोसेफ,** या हारमोनी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.च्या सदस्या असून, भाग प्रमाणपत्र क्र.एच२१ मधील प्रत्येकी रु.५०/- किंमतीचे पूर्ण भरणा केलेले ५ शेअर्स एकूण रु.२५०/- ज्यांचे विशिष्ट क्र.१०६ ते ११० (दोन्ही समाविष्ट) आहेत, त्यामधील ५०% हिस्सा, हक्क, शिर्षक, हितसंबंध व लाभ तसेच सोसायटीच्या इमारतीतील ए विंग मधील २ऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.२०७ मधील ५०% अविभाजित हिस्सा त्यांच्या मालकीचा होता, त्यांचे दिनांक २७.०९.२०१० रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले.

सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून १४ दिवसांत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/ आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुराव्याच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सर्व कामकाजाच्या दिवशी सायं.५.०० ते ८.०० वा. दरम्यान उपलब्ध आहेत. सर्व दावे सोसायटीचे सचिव, हारमोनी कोहौसोलि, इमारत प्लॉट क्र. २८, रहेजा विहार, प्लॉट बी, तुंगवा, पवई, मुंबई - ४०००७२ येथे सादर करावेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १६.०५.२०२६

सही/-
**(श्री.दिपेश जे. सांचला)**
वकिल

## राज्यात यंदा मान्सूनचे आगमन लवकर होणार

**मुंबई** - यंदा राज्यात मान्सूनचे आगमन नेहमीपेक्षा लवकर होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अंदमान आणि निकोबार बेटांमध्ये उद्या म्हणजेच १६ मेपर्यंत मान्सून दाखल होण्यासाठी पोषक वातावरण निर्माण झाल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. साधारणपणे २० मे पर्यंत मान्सून येथे पोहोचतो. मात्र यंदा तो काही दिवस आधी सक्रिय होण्याची चिन्हे आहेत. तिथून ४ जूनपर्यंत तो राज्यात पोहोचू शकतो. हवामान खात्याने १५ ते २६ मे दरम्यान विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवली आहे. काही भागांत हलक्या सरींची नोंद झाली आहे. १७ ते १९ मे दरम्यान वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागानुसार पुढील ४८ तासांत नैऋत्य मान्सून अंदमान समुद्र व अंदमान-निकोबार बेटांमध्ये दाखल होण्यासाठी अनुकूल परिस्थिती तयार होत आहे. तसेच केरळमध्ये २६ मे रोजी जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.




प्रशांत नाईकडे यांनी इन्स्टाग्रामवर हे फोटो पोस्ट केले आहेत. पंतप्रधान मोदी यांनी सोने घेऊ नका असे आवाहन केल्यानंतर प्रसिद्ध ज्वेलर्स लागू बंधू, रांका ज्वेलर्स, पु. ना .गाडगीळ सराफ, चंदुकाका, वामन हरी पेठे यांच्यावर परिणाम होऊन त्यांना भविष्यात काय विकण्याची वेळ येईल त्यांची लक्षवेधी मांडणी केली आहे.

## अनिल अंबानी समूहातील आरकॉमवर सीबीआयचे छापे



■ मुंबई

**आर्थिक** फसवणुकीच्या एका प्रकरणात अनिल धिरुभाई अंबानी समूहातील रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेड (आरकॉम) या कंपनीच्या सात ठिकाणांवर काल सीबीआयने एकाच वेळी छापे टाकले.

मुंबई, गुरुग्राम आणि बंगळुरु या शहरांमध्ये सीबीआयने हे धाडसत्र राबवले. २०१५ ते २०१७ या कालावधीत आरकॉमचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ), मुख्य वित्तीय अधिकारी (सीएफओ) आणि संचालकांच्या निवासस्थानी या धाडी टाकण्यात आल्या.

सीबीआयच्या विशेष न्यायालयाने या सर्वांवर १४ मे रोजी सर्च वॉरंट जारी केले होते. त्याआधारे सीबीआयने ही कारवाई केली. या धाडसत्रात काही महत्त्वाची कागदपत्र सीबीआयच्या हाती लागली असून, त्या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे, असे सीबीआयने प्रसृत केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

अनिल धिरुभाई अंबानी समूहाच्या विरोधात सीबीआयने आर्थिक फसवणुकीचे सात गुन्हे नोंदविले आहेत. एलआयसीसह काही सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी केलेल्या तक्रारींवरून हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या सात गुन्ह्यांमध्ये फसवणुकीची रक्कम सुमारे २७ हजार ३३७ कोटी रुपये आहे.

## भोजशाला हे सरस्वतीचे मंदिर हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**नमाज पठणास परवानगी नाही**

■ भोपाळ

**मध्य** प्रदेशच्या धार जिल्ह्यातील वादग्रस्त भोजशाला मंदिर-कमाल मौला मशीद प्रकरणी आज मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने अंतिम निकाल दिला. ही वास्तु हिंदूंचे मंदिरच आहे, असा स्पष्ट निर्वाळा न्यायालयाने दिला. त्यामुळे कित्येक वर्षांपासून सुरू असलेला हा वाद संपुष्टात येणार आहे.

न्या. विजय कुमार शुक्ला आणि न्या. अलोक अवस्थी यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. भारतीय पुरातत्व विभागाने २००३ मध्ये या ठिकाणी मुस्लिमांना नमाज पठण करू देण्याचा निर्णय दिला होता. तो खंडपीठाने रद्दबातल ठरवला. त्यामुळे भोजशाला येथे यापुढे मुस्लिमांना नमाज पठण करता येणार नाही. मुस्लीम पक्षकार सरकारकडे मशिदीसाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करू शकतात, असे न्यायालयाने सुचविले. भोजशाला संकुल आणि कमाल मौला मशीद ही वास्तू म्हणजे हिंदू देवता सरस्वतीचे मंदिर आहे, असे न्यायालयाने निकालात म्हटले. ऐतिहासिक साहित्य आणि प्राचीन अवशेषांवरून असे स्पष्ट दिसून येते की, या ठिकाणी संस्कृत भाषा शिकवण्यात येत होती. येथे सरस्वती देवीचे मंदिर होते. भोजशाला संकुलातील कमाल मौला मशिदीत मुस्लिमांना नमाज पठण करण्याची परवानगी देणारा आदेश पुरातत्व खात्याने २००३ मध्ये दिला होता. या आदेशाच्या विरोधात अनेक याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्यात आली. न्यायालयाने संबंधित वास्तुचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याचे आदेश एएसआयला दिले होते.

## शिवसेना पक्ष-चिन्हाची पुढील सुनावणी ३० जुलैला

■ नवी दिल्ली

**शिवसेना** पक्ष व धनुष्यबाण चिन्ह प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत न्यायालयाने उबाठाच्या वकिलांना कडक शब्दांत सूचना दिल्या. बेजबाबदार वक्तव्ये टाळावीत, असा इशारा देत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलैला होणार आहे.

उबाठा गटाच्या वतीने वरिष्ठ वकील देवदत्त कामत यांनी प्रकरणाची लवकर सुनावणी घ्यावी, अशी मागणी केली. यावर सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले की, प्रथम तुमच्या लोकांना माध्यमांमध्ये सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत नाही, अशी विधाने करण्यापासून रोखा. अशा प्रकारचे वर्तन स्वीकारले जाणार नाही. सुनावणीदरम्यान न्यायालयाने दोन्ही बाजूंनी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. प्रकरण तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याची बाबही मांडण्यात आली. यावर न्यायालयाने विलंबाबाबत माध्यमांतून होणाऱ्या वक्तव्यांवर नाराजी व्यक्त केली. सरकारच्या वतीने मांडणी करणारे वकील मुकुल रोहतगी यांनीही कोणत्याही पक्षाने अशा प्रकारची विधाने करू नयेत, असे सांगितले. न्यायालयाने अखेर या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० जुलै रोजी निश्चित केली.

## मानसिक आरोग्य क्षेत्रातील आधारवड डॉ. आनंद नाडकर्णी यांचे निधन

■ ठाणे

**ज्येष्ठ** मनोविकारतज्ज्ञ, लेखक, समुपदेशक व मानसिक आरोग्य जनजागृतीचे कार्यकर्ते डॉ. आनंद नाडकर्णी यांचे आज पहाटे ५ वाजताच्या सुमारास निधन झाले. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी मुंबईतील परळ येथील खासगी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या निधनामुळे ठाणे शहरासह वैद्यकीय, साहित्य, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. ११ वाजताच्या सुमारास त्यांचे पार्थिव ठाण्यातील सरस्वती मराठी शाळेत अंत्यदर्शनासाठी ठेवले होते.



त्यानंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा असा परिवार आहे.

नाडकर्णी हे ठाण्यातील समतानगर परिसरात वास्तव्यास होते. १९८० मध्ये एमबीबीएस व १९८४ मध्ये मनोविकारशास्त्रात एमडी ही पदवी संपादन केली. मानसिक आरोग्य क्षेत्रात समाजाभिमुख काम उभे करण्याच्या उद्देशाने त्यांनी २३ मार्च १९९० रोजी ठाण्यात 'आयपीएच' या संस्थेची स्थापना केली. मानसिक आरोग्याबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. मनोविकारांबद्दल मोकळेपणाने चर्चा व्हावी, मानसिक आजारांकडे सहानुभूतीने पाहिले जावे व उपचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावेत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

## भोंदू अशोक खरात प्रकरणात उपजिल्हाधिकारी भांडे-पाटील निलंबित

■ मुंबई

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे-पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात सक्षम प्राधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या भांडे-पाटील यांच्यावर अशोक खरातसोबत आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप आहे. खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावावर असलेल्या जमिनीमध्ये त्यांनी गुंतवणूक केल्याची बाब उघड झाल्याने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. तसेच, अशोक खरात आणि अभिजित भांडे-पाटील यांच्यात मोठ्या प्रमाणावर संपर्क असल्याची माहिती तपासात उघड झाली आहे. दोघांमध्ये एकूण १४३ वेळा फोन कॉल झाले असून, त्यापैकी ८३ कॉल खरातने तर ६० कॉल भांडे-पाटील यांनी केले आहेत. महसूल विभागाने काढलेल्या आदेशानुसार, भांडे-पाटील यांचे खरातसोबत निकटचे संबंध असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाल्या होत्या.

## कांद्याची १२.३५ रुपये किलो दराने खरेदी मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा



■ सातारा

**राज्यातील** कृषी बाजार समित्यांमध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असली तरी दरात मोठी घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत कांदा १२ रुपये ३५ पैसे किलो दराने खरेदी करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

साताऱ्यात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी मंजूर केलेल्या ३० लाख घरांपैकी ५ लाख घरे पूर्ण झाली असून, या घरांचे लोकार्पण तसेच योजनेसाठी १० हजार कोटी रुपयांच्या निधी वितरणाचा कार्यक्रम यावेळी पार पडला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात आहेत. अनेक ठिकाणी कांद्याला एक रुपयापर्यंत दर मिळत असल्याने शेतकरी कांदा फेकून देत आहेत. त्यामुळे केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्याकडे कांदा खरेदी सुरू करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार आता १२ रुपये ३५ पैशांनी कांद्याची खरेदी सुरू करण्यात येणार आहे. केंद्र आणि राज्य सरकार मिळून ऊस कारखानदारी तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांवरील संकट दूर करण्यासाठीही प्रयत्न करत आहोत.

## ३० दिवसांहून जास्त काळ तुरुंगवास मंत्र्यांना पायउतार व्हावे लागणार

■ नवी दिल्ली

**केंद्र सरकार** एक नवीन आणि राजकारणात खळबळ उडवून देणारा कायदा करण्याच्या तयारीत आहे. या कायद्यानुसार पंतप्रधान, मुख्यमंत्री

**केंद्राचे क्रांतिकारक पाऊल**

किंवा कॅबिनेट मंत्री ३० दिवसांपेक्षा अधिक काळ तुरुंगात राहिले तर त्यांना आपल्या पदावरून पायउतार व्हावे लागेल. राज्याचे विशेष सरकारी वकील आणि भाजपाचे खासदार उज्ज्वल निकम यांनी ही माहिती दिली. त्यांनी या निर्णयाला केंद्र सरकारचे क्रांतिकारक पाऊल, असे म्हटले आहे.

सध्याच्या कायद्यानुसार जोपर्यंत एखाद्या लोकप्रतिनिधीला न्यायालयाने दोषी ठरवून किमान दोन वर्षांची शिक्षा सुनावली जात नाही, तोपर्यंत त्याचे पद कायम राहते. मात्र, प्रस्तावित कायद्यानुसार जर एखाद्या लोकप्रतिनिधीला गंभीर गुन्ह्यात अटक झाली आणि त्याला ३० दिवसांच्या आत न्यायालयाने जामीन मंजूर केला नाही तर त्या लोकप्रतिनिधीला आपल्या पदावर राहता येणार नाही.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण रोखणे आणि तुरुंगात राहून सरकार चालवण्याच्या प्रवृत्तीला आळा घालणे, हा या कायद्यामागील उद्देश आहे, असे ॲड. निकम यांनी सांगितले.

## आणखी एका 'नीट' परीक्षार्थ्याची आत्महत्या

■ लखनौ

**'नीट'** परीक्षेतील पेपरफुटी आणि त्यानंतर परीक्षा रद्द करण्याच्या निर्णयामुळे निर्माण झालेल्या तणावातून गोव्यात आणखी एका विद्यार्थ्याने आत्महत्या केली. उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे २० वर्षीय नीट परीक्षार्थी युवकाने गळफास घेऊन जीवन संपवले.

या तरुणाने ३ मे रोजी तिसऱ्यांदा 'नीट-यूजी' परीक्षा दिली होती. मात्र, पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द झाल्याने तो प्रचंड निराश झाला होता. बुधवारी १३ मे रोजी तो आपल्या गावी परतला. रात्री नेहमीप्रमाणे तो आपल्या खोलीत झोपायला गेला, पण गुरुवारी १४ मे रोजी सकाळी उशिरापर्यंत तो बाहेर न आल्याने कुटुंबियांनी दरवाजा तोडून पाहिले. त्यावेळी तो पंख्याला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण नाही तरीही टोलची तयारी? नागरिक संतप्त

■ रायगड

**कोकणातील** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. मात्र या मार्गावर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

टोल वसुलीची तयारी सुरू झाल्याने स्थानिक नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशी संताप व्यक्त करत आहे. अपूर्ण रस्ते, रखडलेली बांधकामे, वाहतूककोंडी, निकृष्ट सेवा रस्ते आणि मूलभूत सुविधांचा अभाव अशा अनेक समस्यांनी त्रस्त असलेल्या नागरिकांना आता तिहेरी टोलचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्ता पूर्ण नाही. मग टोल कशासाठी? असा सवाल कोकणातून जोर धरू लागला आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर आणि माणगाव बायपासचे काम गेली १४-१५ वर्षे रखडल्याने नागरिकांना मोठ्या वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. २०१० पासून सुरू असलेले चौपदरीकरणाचे काम निधीअभावी, भूसंपादनातील अडथळे आणि ठेकेदारांच्या निष्क्रियतेमुळे अद्याप अपूर्णच आहे.

## सुनेत्रा पवारांना कल्पना देऊनच परांजपेंचा शिवसेनेत प्रवेश

■ मुंबई

**माजी** खासदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी अजित पवार गटाला सोडचिठ्ठी देत गुरुवारी

**मंत्री उदय सामंतांचा खुलासा**

शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला. या पक्षप्रवेशानंतर महायुतीतील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वाद निर्माण झाल्याच्या चर्चा होत आहे. मात्र, या सर्व बातम्या निराधार असून, राष्ट्रवादी अध्यक्षा सुनेत्रा पवार यांना कल्पना देऊनच परांजपे यांचा पक्षप्रवेश झाला, असा खुलासा मंत्री उदय सामंत यांनी केला.

उदय सामंत म्हणाले की, महायुतीतील सर्व मित्रपक्षांनी युतीधर्माचे पालन करावे, याबाबत परस्पर सामंजस्य आहे. एखादा पदाधिकारी स्वतःहून पक्ष सोडण्याचा निर्णय घेत असेल, तर तो महायुतीतच राहावा ही आमची जबाबदारी आहे. परांजपे यांनी राष्ट्रवादीचा राजीनामा दिल्यानंतर खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांना पुन्हा शिवसेनेत येण्याचे आवाहन केले होते.

## एआयचा परिणाम! २ आठवड्यात २५ हजार जणांच्या नोकऱ्या गेल्या

■ नवी दिल्ली

**सध्या** कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान अर्थात एआयचा सर्वच क्षेत्रात झपाट्याने प्रसार होत आहे. परिणामी हजारो लोक बेरोजगार होत आहेत. जगभरातील टेक कंपन्यांमध्ये तर एआयचा सर्वाधिक वापर होत आहे. त्या या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कामगार कपात केली जात आहे. चालू महिन्याच्या पहिल्या दोन आठवड्यात जगभरातील मातब्बर टेक कंपन्यांनी सुमारे २५ हजार कामगारांना ले ऑफच्या माध्यमातून घरी बसवले आहे.

सिस्को, पे-पाल आणि



क्लाऊडफ्लेअर यांसारख्या कंपन्यांनी विविध कारणांमुळे कामगार कपात करण्याचा निर्णय घेतला असला तरी मुख्य कारण एआय हेच आहे. पे-पाल ४ हजार ७०० हून अधिक कामगार कपात केली आहे. तर सिस्कोने ४ हजार कामगारांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. पे-पालने पुढील दोन-तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने मनुष्यबळ २० टक्क्यांनी कमी करण्याची योजना आखली आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी इनरिक लोरेस यांनी सांगितले की, आपल्या स्पर्धक कंपन्यांच्या तुलनेत पे-पाल तंत्रज्ञानाच्या आघाडीवर मागे पडली आहे.

## बीडमध्ये आर्थिक विवंचनेतून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील वैतागवाडी येथे आर्थिक विवंचना आणि सामाजिक दबावाला कंटाळून एका तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. अशोक भैया डिसले असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, त्यांच्या आत्महत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. अशोक डिसले हे गेल्या काही महिन्यांपासून गंभीर आर्थिक अडचणीत होते. कांदा पिकासाठी मोठ्या प्रमाणात मेहनत आणि खर्च करूनही बाजारात अत्यंत कमी भाव मिळाल्याने त्यांना मोठा आर्थिक फटका बसला होता. काही दिवसांपूर्वी कांदा विक्रीसाठी बाजारात गेल्यानंतर वाहतूक खर्चही निघाला नसल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय नेकनूर येथील आरक्षण आंदोलन प्रकरणात त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीय आणि सहकाऱ्यांनी केला आहे.

